पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ● वर्ष १६ ● अंक ११ ● शुक्रवार, दि. १७ जुलै २०२६ ● मूल्य ५ ● पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 Web. http://epaper:citynewssuperfast.com


**सुविचार**

यशाचा मुख्य आधार सकारात्मक दृष्टीकोन आणि निरंतर प्रयत्न हाच आहे....






## » थोडक्यात

### 'महेश ट्युटोरियल्स' कोचिंग क्लासेच्या 33 शाखांना टाळं!

मुंबई : महेश ट्युटोरियल्स (एम. टी. एज्युकेअर) या प्रसिद्ध कोचिंग संस्थेने कोणतीही पूर्वसूचना न देता राज्यातील तब्बल ३३ शाखांचे कामकाज अचानक बंद केल्याने हजारो विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. महेश ट्युटोरियल्सची मूळ कंपनी एम. टी. एज्युकेअर लिमिटेड ही गेल्या काही वर्षांपासून गंभीर आर्थिक अडचणीत असल्याचेही समोर आले आहे. कंपनी १६ डिसेंबर २०२२ पासून राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाच्या आदेशानुसार कॉर्पोरेट दिवाळखोरी निवारण प्रक्रियेत आहे. ३० सप्टेंबर २०२५ रोजी संपलेल्या दुसऱ्या तिमाही आणि सहामाहीच्या आर्थिक निकालांवरील स्वतंत्र लेखापरीक्षकांच्या अहवालात कंपनीच्या आर्थिक व्यवहारांबाबत गंभीर आक्षेप नोंदविले आहेत.

### अमेरिकेचा सलग सहाव्या दिवशी इराणवर हवाई हल्ला सुरुच!

वॉशिंग्टन : अमेरिकेने सलग सहाव्या रात्री इराणवर मोठा हवाई हल्ला केला. अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने सांगितले की, लढाऊ विमाने, ड्रोन आणि युद्धनौकांनी इराणच्या अनेक लष्करी तळांवर हल्ला केला. भारताच्या अब्जावधी डॉलर गुंतवणूक असलेल्या चाबहार बंदरावरही क्षेपणास्त्र हल्ला झाला. इराणी वृत्तसंस्था 'मेहर'नुसार, बंदराच्या सागरी नियंत्रण टॉवरला लक्ष्य करण्यात आले. गेल्या आठवड्यात या टॉवरवरील हा तिसरा हल्ला आहे. सेंटकॉमने सांगितले की, या हल्ल्यांमध्ये किनारी निगराणी केंद्रे, हवाई संरक्षण प्रणाली, लष्करी रसद आणि सागरी लष्करी तळांना लक्ष्य करण्यात आले होते.

..............

### भरधाव ट्रेनची शाळेच्या व्हॅनला धडक, 2 विद्यार्थ्यांचा जागीच मृत्यू

मुर्शिदाबाद : पश्चिम बंगालच्या मुर्शिदाबादमध्ये मोठी दुर्घटना घडली आहे. एका भरधाव ट्रेनने शाळेच्या व्हॅनला जोरदार धडक दिली. या धडकेत व्हॅनचा चक्काचूर झाला. तर या अपघातात २ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे. ५ जण गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. ही दुर्घटना मुर्शिदाबादच्या बहरमूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत असलेल्या कर्णसुबर्ण आणि गोंबिदपूर रेल्वे स्टेशनच्या क्रॉसिंगवर घडली.

## उच्चशिक्षित विवाहितेचा छळ करणाऱ्या....

# 'त्या' भोंदू बाबावर आणि सासरच्यांवर कारवाई कधी ?



- मुख्यमंत्री व गृहमंत्र्यांनी दखल घ्यावी
- खदान पोलिसांचा संशयास्पद कारभार !
- घरासमोर फेकतात निंबू आणि बाहुली

संबंधित विवाहितेने अमरावती परिक्षेत्राच्या विशेष पोलीस महानिरीक्षकांना भेटल्यानंतर त्यांनी आदेश दिल्यानंतर या प्रकरणात महाराष्ट्र जादूटोणा विरोधी व अंधश्रध्दा निर्मूलन कायद्यानुसार गुन्हा दाखल केला नसल्याची धक्कादायक माहिती मिळाली आहे. विवाहितेला किरकोळ कारणांवरून मारहाण करणे, बुटाने मारणे, संडास-बाथरूम साफ करायला लावणे असे प्रकार तर घडलेच, पण मारहाणीमुळे या गरोदर माऊलीचा पोटात गर्भपात झाला !. सासरच्यांनी छळ अजून थांबला नसून ते अकोल्यातील सहकार नगर स्थित घरासमोर निंबू व बाहुल्या फेकून मानसिक त्रास देत असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. या सर्व प्रकरणात आता राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी दखल घेतल्यावर अकोला पोलिस गुन्ह्यात वाढ करतील आरोपींच्या विरोधात कठोर कारवाई करतील काय अशी संतप्त विचारणा समाजातून होत आहे.



प्रतिनिधी १७ जुलै

अकोला: अकोला येथील खदान पोलीस स्टेशनच्या अंतर्गत सासरच्या जाचाला आणि भोंदूगिरीला कंटाळून एका उच्चशिक्षित विवाहितेने दिलेल्या तक्रारीनंतर गुन्हा तर दाखल झाला आहे, मात्र पोलिसांच्या एकूणच कार्यपद्धतीवर आता गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सहकार नगर स्थित येथील माहेर असलेल्या 'त्या' परिवारातील या पीडित मुलीवर सासरच्या लोकांनी केलेल्या अमानुष छळाची आणि एका भोंदू बाबाकरवी केलेल्या अघोरी कृत्यांची धक्कादायक माहिती समोर आली आहे. मात्र, इतकी गंभीर वस्तुस्थिती समोर असतानाही खदान पोलीस आरोपींना पाठिशी घालत आहेत की काय, अशी शंका उपस्थित होत आहे.

### जादूटोणा विरोधी गुन्हा दाखल का नाही?

पीड़ित महिलेने दिलेल्या तक्रारीत स्पष्टपणे नमूद केले आहे की, तिच्यावर घरात (सासरी) जबरदस्तीने अघोरी पूजा लादली गेली. असे असतानाही खदान पोलिसांनी केवळ भारतीय न्याय संहितेच्या कलमांतर्गत (कलम ८५, ७४, ३५१(२), ३५२, ३(५)) गुन्हा दाखल केला आहे. महाराष्ट्र जादूटोणा विरोधी व अंधश्रद्धा निर्मूलन कायद्यानुसार कडक कलमे लावण्यास पोलिसांनी टाळाटाळ का केली ? असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे. कायद्याचे रक्षकच जर अशा अघोरी कृत्यांकडे डोळेझाक करणार असतील, तर पीडितेने न्याय मागायचा कुणाकडे ?



### 'त्या' परिवाराला त्रास देणारा 'तो' भोंदू कोण?

तक्रारीतील धक्कादायक माहितीनुसार, सासरच्या मंडळींनी घरात 'जावेद शेख' (रा. महागाव, लोनी जवळ) नावाच्या एका भोंदू बाबाला आणले होते.त्याने पीडितेच्या डोक्यावर लिंबू ठेवून, उर्दू भाषेत मंत्रोच्चार करत अघोरी पूजा केली. एवढेच नव्हे तर, पूजेच्या नावाखाली पीडितेच्या असाहाय्यतेचा फायदा घेत तिच्याशी अत्यंत लज्जास्पद वर्तन केले. या घृणास्पद प्रकारात सासरचे इतर पुरुष आणि महिला सदस्य देखील सामील होते किंवा त्यांनी या कृत्याला मूक संमती दिली होती. पोलीस नेमकी कशाची वाट पाहताहेत अशी विचारणा होत आहे.

## सोयाबीनचे बनावट बियाणे विकणाऱ्या

# तीन कंपन्यांना दणका!

प्रतिनिधी १७ जुलै

पुणे : राज्यात मान्सून उशिराने दाखल होऊनही अनेक जिल्ह्यांत पुरेसा न बरसल्याने दुबार पेरण्यांचे संकट असतानाच बनावट बियाण्यांमुळे शेतकरी फसवणूक झाल्याचे उघड झाले आहे. कृषी विभागाने दिलेल्या आकडेवारीनुसार ६ हजार ३८४ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. यासंदर्भात यासह महाबीज या सरकारी कंपनीसह एकूण पाच कंपन्यांविरोधात सहा हजारांहून अधिक तक्रारी आल्या आहेत. कृषी विभागाने तीन कंपन्यांविरोधात ६ गुन्हे दाखल केले आहेत. दरम्यान, राज्यातील १० जिल्ह्यांत या तक्रारी असून, या बाधित शेतकऱ्यांना राज्य सरकार बियाणे बदलून देणार असून, शेतकऱ्यांचे नुकसान करणाऱ्या कंपन्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

राज्यात यंदा ४७ लाख हेक्टरहून अधिक सोयाबीनचा होण्याची अंदाज आहे. त्यापैकी १५ जुलैअखेर ३९ लाख २० हजार हेक्टरवर पेरणी झाली आहे. मात्र, अकोला, अमरावती, बुलढाणा आणि यवतमाळ यासह एकूण १० जिल्ह्यांमधून सोयाबीनची उगवण झाली नसल्याच्या ६ हजार १७५ तक्रारी आल्या आहेत. या बनावट बियाण्यांमुळे ६ हजार ३८४ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. या तक्रारी आल्यानंतर कृषी विभागाकडून ३ हजार ९४३ तक्रारींची तालुकास्तरीय तक्रार निवारण समितीकडून पाहणी करण्यात आली. त्यात ७ हजार ४२२ सोयाबीन पिकांचे नमुने तपासण्यात आले. प्रयोगशाळांनी दिलेल्या अहवालानुसार यातील नमुने अप्रमाणित असल्याचे आढळले आहे. त्यानुसार तीन कंपन्यांविरोधात ६ गुन्हे दाखल करण्यात आल्याची माहिती कृषी विभागाकडून देण्यात आली.

### या कंपन्यांवर झाले गुन्हे दाखल

बूस्टर प्लँट जेनेटिक्स विरोधात अकोला व अमरावतीत प्रत्येकी एक आणि वर्धा जिल्ह्यात २ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, तर रवी हायब्रीड सीडस अँड रिसर्चविरोधात अकोला जिल्ह्यात तसेच यशोदा हायब्रिड सीडस प्रा. लि. विरोधात बुलढाण्यात एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासह महाबीज या सरकारी कंपनीसह पार्श्व जेनेटिक्स या कंपनीविरोधातही तक्रारी दाखल झाल्या आहेत. तालुकास्तरीय तक्रार निवारण समितीच्या अहवालानंतर संबंधितांवर कारवाई करण्यात येणार आहे.

## जातवैधता प्रमाणपत्र अवैध

# अकोल्यात एमआयएमच्या नगरसेविका सीमा शेख अपात्र

प्रतिनिधी १७ जुलै



अकोला: अकोला महानगर पालिकेतील एमआयएमच्या नगरसेविका सीमा अंजुम शेख अनिस यांचे नगरसेवकपद मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांनी रद्द केले आहे. अनुसूचित जातीच्या राखीव जागेवरील त्यांचा जात दावा जिल्हा जात पडताळणी समितीने फेटाळल्यामुळे ही कायदेशीर कारवाई करण्यात आली. मनपा आयुक्तांनी गुरुवारी या संदर्भातील अधिकृत आदेश जारी केले.सीमा शेख या प्रभाग क्रमांक २ (अ) मधून अनुसूचित जाती प्रवर्गातून निवडून आल्या होत्या. मात्र, जिल्हा जात पडताळणी समितीने ६ जुलै रोजी दिलेल्या आदेशात त्यांचा जात दावा वैध नसल्याचे नमूद केले. कायद्यानुसार, राखीव जागेवर निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराला निश्चित कालावधीत जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असते. समितीने दावा नाकारल्यास सदस्यत्व रद्द करण्याची कायद्यात तरतूद आहे. या धसक्यामुळे मनपा वर्तुळात खळबळ उडाली असून, आणखी दोघांवर कारवाईची टांगती तलवार आहे. यामध्ये प्रभाग १ (अ) मधील काँग्रेसचे ओबीसी नगरसेवक शेख अब्दुल्ला शेख सलीम आणि प्रभाग १६ (ब) मधील राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या ओबीसी नगरसेविका अमरीन सदफ अब्दुल रशीद यांचा समावेश आहे. सध्या त्यांना उच्च न्यायालयाच्या खंडपीठाकडून अंतरिम स्थगिती मिळाली असली, तरी त्यांची धाकधूक वाढली आहे.


## अभिषेकने केला 'अभिषेक'

अकोला : स्थानिक गुन्हे शाखेने अकोला एमआयडीसीत धाड टाकून अवैध गुटखा निर्मितीच्या मोठ्या कारखान्याचा पर्दाफाश केला. या प्रकरणाचा मुख्य सूत्रधार अभिषेक गजानन गई हा महानगरपालिकेच्या जलप्रदाय विभागात बाह्यस्रोत अभियंता असून, तो एका वजनदार नगरसेवकाचा भाचा आहे.

दुसऱ्याच्या नावावर मनपात ठेकेदारी करणे, एमआयडीसीत बेकायदेशीर जागा बळकावणे आणि गुटखा फॅक्टरीत भागीदारी करणे अशा गंभीर बाबी समोर आल्या आहेत. विशेष म्हणजे, आपल्या कर्मचाऱ्यावर गुन्हा दाखल झाल्याची साधी माहितीही मनपाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना नव्हती. सध्या या प्रकरणात 'मोक्का' अंतर्गत कारवाईच्या हालचाली अचानक थंडावल्या आहेत. त्यामुळे कारवाईतून स्वतःचे नाव वाचवण्यासाठी अभिषेकने नेमका कोणावर आणि किती रुपयांचा 'अभिषेक' केला, अशी जोरदार चर्चा आता रंगू लागली आहे.

# मोठा राजकीय भूकंप! शरद पवार शिंदेंसोबत; एनडीएचा दरवाजा उघडला,फॉर्म्युला तयार !

राजेश जायस्वाल १७ जुलै



मुंबई: महाराष्ट्रातील विरोधी आघाडी महाविकास आघाडीला (एमव्हीए) मोठा धक्का बसला आहे. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने (एनसीएसपी) आता एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेसोबत आघाडी करण्याचा निर्णय घेतला आहे. याचा अर्थ महायुती आघाडीमध्येच आणखी एक आघाडी तयार होणार आहे. शरद पवार आपला पक्ष थेट एनडीएमध्ये विलीन करणार नाहीत, तर शिंदे यांच्या शिवसेनेला पाठिंबा देत आघाडीत सामील होतील.

सूत्रांनी असेही वृत्त दिले आहे की, जयंत पाटील यांना सरकारमध्ये अर्थमंत्रीपदाची ऑफर दिली जाऊ शकते. हे पद यापूर्वी देवेंद्र फडणवीस यांचे निकटचे सहकारी आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांच्याकडे होते. आता शरद पवार गट एकनाथ शिंदे यांच्यासोबत आल्याने राजकीय समीकरणे काय असतील? जयंत पाटील यांनी अवघ्या दोन दिवसांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यानंतर, गुरुवारी (१६ जुलै) जयंत पाटील आणि जितेंद्र आव्हाड यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. एकनाथ शिंदे आणि जितेंद्र आव्हाड दोघेही ठाण्याचे असून तेथे त्यांना कट्टर प्रतिस्पर्धी मानले जाते. ही भेट महत्त्वपूर्ण मानली जात होती.जेव्हा शरद पवार यांच्या एनडीएत सामील होण्यावर पहिल्यांदा चर्चा झाली, तेव्हा सत्ताधारी पक्ष असलेल्या भाजपने शरद पवार आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने पुन्हा एकत्र यावे असा प्रस्ताव दिला होता. मात्र, हा प्रस्ताव दोन्ही पक्षांना मान्य नव्हता. सुनेत्रा पवार यांना पक्षांतर्गत सत्तावाटपाची व्यवस्था नको होती. दुसरीकडे, शरद पवार यांच्यासारखे ज्येष्ठ नेते आणि सुप्रिया सुळे यांच्यासारख्या ज्येष्ठ खासदार सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली कसे काम करू शकतील, असा प्रश्न शरद गटानेही उपस्थित केला होता. या सर्व कारणांमुळे दोन्ही गटांचे विलीनीकरण होऊ शकले नाही. इतके मोठे पक्ष सामील झाल्यानंतर महाआघाडीत अस्वस्थता निर्माण होऊ नये, अशी भाजपचीही इच्छा होती. जागावाटपावरून कोणताही वाद टाळण्यासाठी पक्षाने एक सूत्र निश्चित केले होते. शरद पवार आणि एकनाथ शिंदे यांच्यात या विषयावर आधीच चर्चा सुरू होती. शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस-सपा आणि भाजप यांची युती होईल, असे दोन्ही बाजूंनी ठरवले होते.

# देशातील पहिली 'हायड्रोजन ट्रेन' आजपासून धावणार!

## आज ट्रेनचा शुभारंभ : क्लीन आणि ग्रीन एनर्जीच्या नव्या युगाला प्रारंभ

प्रतिनिधी १७ जुलै

जींद : आज भारतातील पहिली हायड्रोजन ट्रेन धावणार आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी ट्रेनला हिरवा झेंडा दाखवतील आणि त्यानंतर ही ट्रेन सुरू होईल. देशातील पहिल्या हायड्रोजन ट्रेनचा शुभारंभ होत आहे. डिझेलचा धूर नाही की विजेच्या ओव्हरहेड तारांचे टेन्शन नाही; ही ट्रेन चक्क पाण्यापासून तयार होणाऱ्या ऊर्जेवर धावणार आहे. ही ट्रेन चालवण्यासाठी हायड्रोजन फ्युएल सेल तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. पारंपरिक रेल्वे इंजिनांना चालवण्यासाठी वरून विजेच्या तारा लागतात किंवा डिझेल इंजिन लागते. मात्र, हायड्रोजन ट्रेन स्वतःची वीज स्वतःच तयार करते. ट्रेनच्या छतावर किंवा पॉवर कारमध्ये हायड्रोजन गॅसच्या टाक्या असतात. हवेतील ऑक्सिजन आणि टाक्यांमधील हायड्रोजन जेव्हा फ्युएल सेलमध्ये एकत्र येतात, तेव्हा त्यांच्यात रासायनिक प्रक्रिया होऊन मोठी वीज निर्माण होते. हीच वीज ट्रेनच्या मोटरला फिरवते आणि ट्रेन धावू लागते.

### १०० टक्के पर्यावरणपूरक ट्रेन

या संपूर्ण प्रक्रियेत इंधन म्हणून हायड्रोजन जळत असल्यामुळे रासायनिक प्रक्रियेच्या शेवटी कोणताच घातक वायू बाहेर पडत नाही. सायलेन्सरमधून धुराऐवजी केवळ पाण्याची वाफ आणि हलकी उष्णता बाहेर पडते. त्यामुळे ही ट्रेन १०० टक्के पर्यावरणपूरक आहे. डिझेल इंजिनचा होणारा मोठा खडखडाट या ट्रेनमध्ये नसतो. ही ट्रेन अत्यंत शांतपणे धावते, ज्यामुळे प्रवाशांना विमानात बसल्यासारखा शांत आणि आरामदायी प्रवास अनुभवता येतो.

### वेळेचीही होणार बचत!

सध्याची डेमू (डिझेल) ट्रेन सुमारे २ तास एवढा वेळ घेते तर बाय रोडने गेल्यास या मार्गावर प्रवास केल्यास साधारण १ तास ३० मिनिटे तर नवी हायड्रोजन ट्रेन फक्त १ तास निश्चित स्थळी पोहोचविणार आहे. त्यामुळे पैशांसोबतच वेळेचीही बचत होणार आहे.

### असा असेल या ट्रेनचा मार्ग

जींद ते सोनीपत हे अंतर ८९ किलोमीटर आहे. आतापर्यंत हा प्रवास करण्यासाठी प्रवाशांना मोठा वेळ खर्च करावा लागत होता. मात्र, हायड्रोजन ट्रेनने वेळेचे गणित पूर्णपणे बदलून टाकले आहे. या हायड्रोजन ट्रेनचे किमान भाडे केवळ ५ रुपये ठेवण्यात आले आहे, तर संपूर्ण ८९ किलोमीटरच्या प्रवासासाठीचे कमाल भाडे फक्त २५ रुपये निश्चित करण्यात आले आहे.



## 14 कृषी अधिकाऱ्यांना 'शो-कॉज' !

अकोला : राज्यात खरिपाच्या ऐन हंगामात बोगस बियाण्यांमुळे शेतकरी हवालदील झाला असतानाच, कृषी विभागाचा आणखी एक गंभीर निष्काळजीपणा समोर आला आहे. सोयाबीन बियाण्यांचे सॅम्पल लॅबमध्ये अप्रमाणित (फेल) होऊनही अहवाल दाबून ठेवणाऱ्या आणि बोगस कंपन्यांना अभय देणाऱ्या कृषी अधिकाऱ्यांवर अखेर प्रशासकीय बडगा उगारण्यात आला आहे. 'सिटी न्यूज सुपरफास्ट'ने १४ जुलै रोजी 'देवाभाऊंच्या सरकारचे अपयश' या मथळ्याखाली प्रसिद्ध केलेल्या बातमीची थेट मंत्रालयाने दखल घेतली असून, गुणनियंत्रणात कुचराई करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांना कारणे दाखवा (शो-कॉज) नोटीस बजावण्यात आली आहे. तपासणीत १८३ सॅम्पल्स अप्रमाणित आढळले. नियमानुसार, बियाण्यांचे नमुने फेल झाल्यास संबंधित लॉटची विक्री थांबवणे आणि कंपन्यांवर कडक फौजदारी गुन्हे दाखल करणे आवश्यक होते.

## अयोध्या मंदिर देणगी चोरी प्रकरण

# रामरक्षा' विरुद्ध 'हनुमान चालीसा'!

## विदर्भात 18 जुलैला ठाकरे-राणा आमनेसामने

प्रतिनिधी १७ जुलै



अमरावती : अयोध्येतील कथित दान अपहारावरून शिवसेना (उबाठा) आक्रमक झाली असून, पक्षाने राज्यभरात रामरक्षा आंदोलन छेडले आहे. मुंबईनंतर आता माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे थेट नागपुरात शक्तिप्रदर्शन करणार आहेत. ठाकरेंच्या या आंदोलनाला प्रत्युत्तर म्हणून माजी खासदार नवनीत राणा उद्या, १८ जुलैला अमरावती शहराजवळील प्रसिद्ध हनुमान गढी येथे हनुमान चालीसाचे पठण करणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या धरमपेठ येथील निवासस्थानाजवळ असलेल्या रामनगरच्या श्रीराम मंदिरात शनिवारी उद्धव ठाकरे रामरक्षा पठण करणार आहेत. मात्र, या आंदोलनावरून भाजप नेत्या आणि माजी खासदार नवनीत राणा यांनी ठाकरेंवर अत्यंत बोचरी टीका केली आहे. हनुमान गढीच्या नरेशाचा हा चमत्कार आहे, म्हणूनच ठाकरेंना रामरक्षा पठण करण्याची सद्बुद्धी सुचली, असा टोला त्यांनी लगावला. नवनीत राणा यांनी ठाकरेंवर निशाणा साधताना जुन्या संघर्षाची आठवण करून दिली. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले की, 'श्री हनुमान चालीसा पठणाला विरोध करणाऱ्या उद्धवा, कसा होतास तू आणि कसा झालास तू! अखेर अहंकाराची शिक्षा मिळाली आणि आता श्री रामरक्षा आठवली. सत्ता गेली, पक्ष गेला, आमदार-खासदारही गेले आणि बाळासाहेबांचे हिंदुत्वाचे विचारही सुटले', असा टोलाही लगावला आहे.

### जुन्या वादाला फुटले तोंड

» उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना नवनीत राणा आणि आमदार रवी राणा यांनी ठाकरेंचे निवासस्थान 'मातोश्री' बाहेर हनुमान चालीसा वाचण्याची घोषणा केली होती. त्यावेळी शिवसैनिकांनी त्याला तीव्र विरोध केला होता. या वादानंतर राणा दाम्पत्यावर राजद्रोहाचा गुन्हा दाखल होऊन त्यांना २३ एप्रिल २०२२ रोजी अटक करण्यात आली होती. १४ दिवस तुरुंगात घालवावे लागल्याची आठवण करून देत, केवळ हनुमान चालीसा वाचणार म्हणून आमच्यावर राजद्रोह लावणाऱ्यांना आज स्वतः रामरक्षा वाचायला लागत आहे, अशी टीका राणा यांनी केली.

सिटी न्यूज सुपरफास्ट
विविधा २
शुक्रवार, दि. १७ जुलै २०२६ Web. http://epaper.citynewssuperfast.com

# सर्वाधिक अकादमी पुरस्कार जिंकण्याचा अन् नामांकन मिळवण्याचा विक्रम करणारे वॉल्टर डिस्ने!

## 17 जुलैला केली होती डिस्ने लँडची स्थापना



वॉल्टर एलियास डिस्ने हे एक अमेरिकन ॲनिमेटर, चित्रपट निर्माता, आवाज कलाकार आणि उद्योजक होते. अमेरिकन ॲनिमेशन उद्योगाचे प्रणेते म्हणून , त्यांनी कार्टूनच्या निर्मितीमध्ये अनेक नवीन शोध लावले. एक चित्रपट निर्माता म्हणून, एका व्यक्तीद्वारे सर्वाधिक अकादमी पुरस्कार (२२) जिंकण्याचा आणि नामांकने (५९) मिळवण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. त्यांना इतर सन्मानांसोबत दोन गोल्डन ग्लोब विशेष कामगिरी पुरस्कार आणि एक एमी पुरस्कार प्रदान करण्यात आला . त्यांचे अनेक चित्रपट लायब्ररी ऑफ काँग्रेसद्वारे राष्ट्रीय चित्रपट नोंदणीमध्ये समाविष्ट आहेत आणि अमेरिकन फिल्म इन्स्टिट्यूटद्वारे सर्वोत्कृष्ट चित्रपटांपैकी काही म्हणूनही त्यांची निवड झाली आहे .

१९०१ मध्ये शिकागो येथे जन्मलेले आणि प्रामुख्याने मिसूरीमध्ये वाढलेले डिस्ने यांना लहानपणापासूनच चित्रकलेची आवड होती. त्यांनी लहानपणी कलेचे वर्ग घेतले आणि वयाच्या १८ व्या वर्षी व्यावसायिक चित्रकार म्हणून नोकरी पत्करली. १९२० च्या दशकाच्या सुरुवातीला ते कॅलिफोर्नियाला गेले आणि त्यांनी आपला भाऊ रॉय याच्यासोबत डिस्ने ब्रदर्स स्टुडिओ (आताची वॉल्ट डिस्ने कंपनी ) सुरू केला . उब आयवर्क्स यांच्यासोबत त्यांनी १९२८ मध्ये मिकी माऊस हे पात्र विकसित केले , जे त्यांचे पहिले अत्यंत लोकप्रिय यश ठरले; सुरुवातीच्या काळात त्यांनी आपल्या या पात्राला आवाजही दिला. जसजसा स्टुडिओ वाढत गेला, तसतसे ते अधिक धाडसी बनले आणि त्यांनी सिंक्रोनाइज्ड साउंड , पूर्ण-रंगीत थ्री-स्ट्रिप टेक्निकोलर, ॲनिमेटेड फीचर फिल्म्स आणि कॅमेऱ्यांमधील तांत्रिक विकास सादर केला. स्नो व्हाईट अँड द सेव्हन ड्वार्फ्स (१९३७), पिनोकिओ , फँटासिया (दोन्ही १९४०), डंबो (१९४१) आणि बाम्बी (१९४२) यांसारख्या चित्रपटांमध्ये दिसलेल्या या परिणामांनी ॲनिमेटेड चित्रपटांच्या विकासाला आणखी चालना दिली. दुसऱ्या महायुद्धानंतर सिंड्रेला (१९५०), स्लीपिंग ब्यूटी (१९५९) आणि मेरी पॉपिन्स (१९६४) यांसारखे नवीन ॲनिमेटेड आणि लाइव्ह-ॲक्शन चित्रपट आले, ज्यापैकी शेवटच्या चित्रपटाला पाच अकादमी पुरस्कार मिळाले.

१९५० च्या दशकात, डिस्नेने थीम पार्क उद्योगात विस्तार केला आणि जुलै १९५५ मध्ये त्याने कॅलिफोर्नियातील ॲनाहिम येथे डिस्नेलँड उघडले. या प्रकल्पासाठी निधी उभारण्याकरिता त्याने 'वॉल्ट डिस्नेज डिस्नेलँड' आणि 'द मिकी माऊस क्लब' यांसारख्या दूरदर्शन कार्यक्रमांमध्येही प्रवेश केला. तो १९५९ च्या मॉस्को फेअर , १९६० च्या हिवाळी ऑलिम्पिक आणि १९६४ च्या न्यूयॉर्क वर्ल्ड फेअरच्या नियोजनातही सहभागी होता. १९६५ मध्ये, त्याने डिस्ने वर्ल्ड नावाच्या आणखी एका थीम पार्कचा विकास सुरू केला, ज्याच्या केंद्रस्थानी ' एक्सपेरिमेंटल प्रोटोटाइप कम्युनिटी ऑफ टुमॉरो ' नावाचे एका नवीन प्रकारचे शहर असणार होते. डिस्ने आयुष्यभर खूप धूम्रपान करत असे आणि पार्क प्रकल्प पूर्ण होण्यापूर्वीच १९६६ मध्ये फुफ्फुसाच्या कर्करोगाने त्याचे निधन झाले. डिस्ने खाजगी आयुष्यात एक लाजाळू, स्वतःला कमी लेखणारा आणि असुरक्षित माणूस होता, पण सार्वजनिक जीवनात त्याने एक प्रेमळ आणि मनमोकळे व्यक्तिमत्व स्वीकारले होते. त्याचे मापदंड आणि त्याच्यासोबत काम करणाऱ्यांकडून असलेल्या त्याच्या अपेक्षा खूप उच्च होत्या. तो वंशवादी किंवा ज्यूद्वेष्टा असल्याचा आरोप त्याच्यावर झाला असला तरी, त्याला ओळखणाऱ्या अनेकांनी हे आरोप खोडून काढले आहेत. डिस्नेच्या इतिहासलेखनाने विविध दृष्टिकोन स्वीकारले आहेत, ज्यात त्याला साध्या देशभक्तीपर मूल्यांचा पुरस्कर्ता मानण्यापासून ते अमेरिकन सांस्कृतिक साम्राज्यवादाचा प्रतिनिधी मानण्यापर्यंतच्या दृष्टिकोनांचा समावेश आहे. २० व्या शतकातील सर्वात प्रभावशाली सांस्कृतिक व्यक्तींपैकी एक म्हणून मोठ्या प्रमाणावर ओळखले जाणारे डिस्ने, ॲनिमेशनच्या इतिहासात आणि अमेरिकेच्या सांस्कृतिक इतिहासात एक महत्त्वाचे स्थान टिकवून आहेत , जिथे त्यांना एक राष्ट्रीय सांस्कृतिक प्रतीक म्हणून मान्यता आहे . त्यांचे चित्रपट आजही दाखवले जातात आणि रूपांतरित केले जातात, जगभरातील डिस्ने थीम पार्क्सचा आकार आणि संख्या वाढली आहे आणि त्यांची कंपनी जगातील सर्वात मोठ्या मास मीडिया आणि मनोरंजन समूहांपैकी एक बनली आहे .

### बालपण आणि शिक्षण

वॉल्टर एलियास डिस्ने यांचा जन्म ५ डिसेंबर १९०१ रोजी अमेरिकेतील इलिनॉय राज्यातील शिकागोच्या हर्मोसा परिसरातील १२४९ ट्रिप अव्हेन्यू येथे झाला. ते एलियास डिस्ने यांचे चौथे पुत्र होते . एलियास डिस्ने यांचा जन्म कॅनडा प्रांतात अँग्लो-आयरिश पालकांच्या पोटी झाला होता आणि त्यांची आई फ्लोरा ( माहेरचे नाव कॉल) या जर्मन आणि इंग्रजी वंशाच्या अमेरिकन होत्या. वॉल्ट व्यतिरिक्त, एलियास आणि फ्लोरा यांचे पुत्र हर्बर्ट, रेमंड आणि रॉय होते ; आणि या जोडप्याला डिसेंबर १९०३ मध्ये रूथ नावाची पाचवी मुलगी झाली. जेव्हा डिस्ने चार वर्षांचे होते, तेव्हा त्यांचे कुटुंब मिसूरीमधील मार्सेलीन येथील एका शेतावर राहायला गेले , जिथे त्यांचे काका रॉबर्ट यांनी नुकतीच जमीन खरेदी केली होती. मार्सेलीनमध्ये, एका निवृत्त स्थानिक डॉक्टरच्या घोड्याचे चित्र काढण्यासाठी पैसे मिळाल्यावर डिस्ने यांना चित्रकलेत रस निर्माण झाला.

### मिकी माऊसची निर्मिती आणि त्यानंतरचे यश

ऑस्वॉल्डची जागा घेण्यासाठी, डिस्ने आणि आयवर्क्स यांनी मिकी माऊस विकसित केला , कदाचित डिस्नेने त्याच्या लाफ-ओ-ग्राम स्टुडिओमध्ये काम करत असताना दत्तक घेतलेल्या एका पाळीव उंदरापासून त्यांना प्रेरणा मिळाली असावी, जरी या पात्राचे मूळ अस्पष्ट आहे. डिस्नेची मूळ निवड मॉर्टिमर माऊस हे नाव होते, परंतु त्याची पत्नी लिलियनला ते खूपच डामडौल वाटले आणि तिने त्याऐवजी मिकी हे नाव सुचवले. आयवर्क्सने डिस्नेच्या तात्पुरत्या रेखाचित्रांमध्ये सुधारणा केली जेणेकरून पात्राला ॲनिमेट करणे सोपे होईल. डिस्ने, ज्याने ॲनिमेशन प्रक्रियेपासून स्वतःला दूर करण्यास सुरुवात केली होती, त्याने १९४७ पर्यंत मिकीला आवाज दिला. डिस्नेच्या एका कर्मचाऱ्याच्या शब्दांत, 'उबने मिकीचे शारीरिक स्वरूप डिझाइन केले, पण वॉल्टने त्याला त्याचा आत्मा दिला.' मिकी माऊस पहिल्यांदा मे १९२८ मध्ये 'प्लेन क्रेझी ' या लघुपटाच्या एका चाचणी प्रदर्शनाच्या रूपात दिसला , परंतु त्याला आणि दुसऱ्या चित्रपटाला, 'द गॅलोपिन' गौचो'ला , वितरक मिळू शकला नाही. १९२७ च्या गाजलेल्या ' द जॅझ सिंगर'नंतर , डिस्नेने तिसरा लघुपट, ' स्टीमबोट विली'वर सिंक्रोनाइझ्ड साउंडचा वापर करून पहिला पोस्ट-प्रोड्युस्ड साउंड कार्टून तयार केला. ॲनिमेशन पूर्ण झाल्यावर, डिस्नेने युनिव्हर्सल पिक्चर्सचे माजी कार्यकारी अधिकारी , पॅट पॉवर्स यांच्यासोबत 'पॉवर्स सिनेफोन' रेकॉर्डिंग प्रणाली वापरण्यासाठी करार केला. सिनेफोन डिस्नेच्या सुरुवातीच्या साउंड कार्टून्ससाठी नवीन वितरक बनले, जे लवकरच लोकप्रिय झाले.

### ॲनिमेशनचे सुवर्णयुग

१९३४ पर्यंत, डिस्ने कार्टून शॉर्ट्स बनवण्याने असमाधानी झाले होते, आणि त्यांचा विश्वास होता की एक पूर्ण लांबीचा कार्टून चित्रपट अधिक फायदेशीर ठरेल. स्टुडिओने परीकथेवर आधारित 'स्नो व्हाईट अँड द सेव्हन ड्वार्फ्स'च्या चार वर्षांच्या निर्मितीला सुरुवात केली . जेव्हा या प्रकल्पाबद्दलची बातमी बाहेर फुटली, तेव्हा चित्रपट उद्योगातील अनेकांनी भाकीत केले की यामुळे कंपनी दिवाळखोर होईल; उद्योगातील जाणकारांनी याला 'डिस्नेची मूर्खपणाची कृती' असे टोपणनाव दिले. हा चित्रपट, जो पूर्ण रंग आणि आवाजासह बनवलेला पहिला ॲनिमेटेड चित्रपट होता, त्याच्या निर्मितीसाठी १.५ दशलक्ष खर्च आला — जो अंदाजित खर्चाच्या तिप्पट होता. ॲनिमेशन शक्य तितके वास्तववादी असावे यासाठी, डिस्नेने आपल्या ॲनिमेटर्सना चौइनार्ड आर्ट इन्स्टिट्यूटमध्ये अभ्यासक्रमासाठी पाठवले; त्यांनी स्टुडिओमध्ये प्राणी आणले आणि अभिनेत्यांना कामावर ठेवले जेणेकरून ॲनिमेटर्सना वास्तववादी हालचालींचा अभ्यास करता येईल. कॅमेरा दृश्यातून फिरत असताना पार्श्वभूमीचा बदलता दृष्टिकोन दर्शवण्यासाठी, डिस्नेच्या ॲनिमेटर्सनी एक मल्टीप्लेन कॅमेरा विकसित केला , ज्यामुळे काचेच्या तुकड्यांवरील चित्रे कॅमेऱ्यापासून वेगवेगळ्या अंतरावर ठेवता येत होती आणि खोलीचा आभास निर्माण होत होता. कॅमेरा दृश्यातून जात असल्याचा आभास निर्माण करण्यासाठी काच हलवता येत होती. या कॅमेऱ्यावर तयार केलेली पहिली कलाकृती 'द ओल्ड मिल' (१९३७) नावाची एक सिली सिम्फनी तिच्या प्रभावी दृश्यात्मक शक्तीमुळे ॲनिमेटेड लघुपटासाठी अकादमी पुरस्कार जिंकली मल्टीप्लेन कॅमेरा पूर्ण होईपर्यंत 'स्नो व्हाईट' मोठ्या प्रमाणात पूर्ण झाली असली तरी, डिस्नेने नवीन प्रभाव वापरण्यासाठी काही दृश्ये पुन्हा रेखाटण्याचे आदेश दिले.

## विद्रोही आंबेडकरवादी कथांचे उद्गाते अन् वास्तववादी कादंबरीकार



बाबुराव बागुल यांची आज जयंती

बाबुराव बागुल हे आंबेडकरवादी साहित्यासाठी ओळखले जाणारे मराठी लेखक, कवी होते. विद्रोही आंबेडकरवादी कथांचे प्रमुख उद्गाते आणि प्रखर वास्तववादी कादंबरीकार तसेच शोषित, उपेक्षित, झोपडपट्टीतील, फुटपाथवरील भणंग जनजीवनाचे भेदक चित्रण करणारे लेखक म्हणून त्यांची ओळख होती. प्रभावी व विद्रोही भाषाशैली, जिवंत प्रसंगचित्रण, कारुण्य आणि क्रुरता रेखाटन हे त्यांच्या लेखनाचे विशेष गुण होते. दलित साहित्यामध्ये मोठे योगदान देणारे एक प्रतिभावंत लेखक साहित्यिक म्हणून बाबूराव बागुल यांना एक नवी ओळख मिळालेली आहे. त्यांनी लिहिलेल्या कथा व कादंबऱ्या या गावकुसाबाहेर राहणाऱ्या समाजाच्या सामाजिक जाणिवांचं व वेदनांचं वर्णन करणारे आहेत. स्त्रीप्रधान कथालेखन हा देखील त्यांच्या लिखाणाचा महत्त्वाचा भाग राहिलेला आहे. सूड कथेमध्ये बाबुराव बागुल यांनी वाडी वस्तीवरील स्त्रीच्या हृदयद्रावक व तिच्यावर ओढवलेल्या प्रसंगाचं चित्रण केलेले आहे. या कथेतील स्त्री पात्र हे समाजातील स्त्रियांच्या शोषित पीडित स्त्रीच्या सामाजिक स्थितीचं चित्रण करणार आहे.

बाबुराव बागुल १७ जुलै १९३० रोजी महाराष्ट्राच्या नाशिक जिल्ह्यातील 'विहितगाव' नावाच्या खेड्यात जन्मले. दलित जातीत जन्मल्यामुळे जातीय विषमतेचे अनुभव त्यांनी लहानपणापासूनच घेतले. बागुलांच्या आधीची भावंडे जगली नाहीत; तेव्हा ते तरी जगावेत या विचाराने बागुलांच्या वडिलांनी त्यांना मुंबईला माटुंग्याच्या लेबर कँपात राहणाऱ्या मावशीकडे पाठवून दिले. तेथील महानगरपालिकेच्या शाळेतच ते शिकू लागले. त्या सुमारास वाढू लागलेल्या आंबेडकरवादी विचारांचा परिणाम शालेय वयात असलेल्या बागुलांवरही झाला. चौथ्या इयत्तेत असतानाच त्यांनी एक आंबेडकरगीत लिहिले. आर्थिक परिस्थितीमुळे मॅट्रिकनंतर त्यांना शिक्षण थांबवावे लागले. नोकरीच्या शोधात असलेल्या बागुलांवर त्यादरम्यान मुंबईत बळावू लागलेल्या कामगार चळवळीचा प्रभाव पडला. माटुंग्याच्या लेबर कँपातच राहत असलेल्या अण्णाभाऊ साठेंच्या संपर्कातून ते कामगार चळवळीत सहभागी झाले. या काळात त्यांनी साम्यवादी विचारवंतांच्या साहित्याचा अभ्यास केला. बेरोजगारी, आर्थिक-सामाजिक विषमता यांविरुद्ध या कालखंडात त्यांनी रचलेल्या कवितांमधून या विचारांचा प्रभाव जाणवतो.

१९५५ मध्ये रेल्वे वर्कशॉपात नोकरी मिळाल्यामुळे बागुल सुरतेस गेले.

### सन्मान व पुरस्कार

धारावी (मुंबई), येथे ७ फेब्रुवारी १९९९ रोजी भरलेल्या पहिल्या विद्रोही साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद. उद्घाटनाचे भाषण डॉ. आ.ह. साळुंखे यांनी केले होते. बागुलांच्या साहित्यिक कार्याचा गौरव म्हणून कविवर्य कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा 'जनस्थान पुरस्कार' २००७ साली त्यांना देण्यात आला. महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्कार, जनस्थान पुरस्कार असे अनेक मान-सन्मान त्यांना प्राप्त झाले.

## इथेनॉल वापराचे फायदे आणि तोटे

इथेनॉल हे प्रामुख्याने ऊस, मका किंवा इतर धान्यांपासून बनवले जाणारे एक प्रकारचे अल्कोहोल आहे, ज्याचा वापर पेट्रोलमध्ये मिसळून जैवइंधन म्हणून मोठ्या प्रमाणावर केला जातो. भारतासह जगभरात हरित ऊर्जेला प्रोत्साहन देण्यासाठी याचा वापर वाढवला जात आहे. इथेनॉल वापराचे मुख्य फायदे आणि तोटे खालीलप्रमाणे आहेत.

इथेनॉल वापराचे फायदे

**प्रदूषणात घट:** इथेनॉल हे ऑक्सिजनयुक्त इंधन असल्याने जेव्हा ते पेट्रोलमध्ये मिसळले जाते, तेव्हा इंधनाचे पूर्ण ज्वलन होते. यामुळे कार्बन मोनॉक्साइड आणि इतर घातक वायूंचे हवेतील उत्सर्जन लक्षणीयरीत्या कमी होते.

**आयात खर्चात बचत:** भारत आपल्या गरजेच्या बहुतांश कच्चे तेल परदेशातून आयात करतो. पेट्रोलमध्ये इथेनॉलचे मिश्रण केल्याने कच्च्या तेलाची आयात कमी होऊन देशाचे अब्जावधी रुपये वाचतात.

**शेतकऱ्यांना आर्थिक फायदा:** इथेनॉल प्रामुख्याने ऊसाची मळी, खराब झालेले धान्य आणि मक्यापासून तयार केले जाते. यामुळे शेतकऱ्यांच्या मालाला चांगला भाव मिळतो आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ मिळते.

**नूतनीकरणक्षम ऊर्जा:** खनिज तेल मर्यादित आहे, पण इथेनॉल




हे शेतीतील पिकांपासून तयार होत असल्याने ते कधीही न संपणारे म्हणजेच नूतनीकरणक्षम (Renewable) इंधनाचा स्रोत आहे.

**इंजिनची कार्यक्षमता:** इथेनॉलचा ऑक्टेन नंबर (Octane Number) जास्त असतो, ज्यामुळे वाहनाच्या इंजिनची ताकद आणि कार्यक्षमता वाढण्यास मदत होते.

**इथेनॉल वापराचे तोटे कमी मायलेज:** पेट्रोलच्या तुलनेत इथेनॉलमध्ये ऊर्जेची घनता (Energy Density) कमी असते. त्यामुळे पेट्रोलमध्ये इथेनॉलचे प्रमाण जास्त असल्यास वाहनाचे मायलेज थोडे कमी होते.

पाण्याची मोठी गरज: इथेनॉल तयार करण्यासाठी ऊस आणि मक्याची मोठ्या प्रमाणावर लागवड करावी लागते. या पिकांसाठी पाण्याचा प्रचंड वापर होतो, ज्यामुळे पाणी टंचाईच्या भागात समस्या निर्माण होऊ शकते.

**अन्न विरुद्ध इंधन वाद:** जर मोठ्या प्रमाणावर लागवडीखालील जमीन अन्नधान्याऐवजी केवळ इथेनॉल निर्मितीसाठी वापरली गेली, तर भविष्यात अन्नधान्याचा तुटवडा निर्माण होऊन त्यांच्या किमती वाढू शकतात. **वाहनांच्या इंजिनवर परिणाम:** जुनी वाहने जास्त प्रमाणात इथेनॉल मिश्रित पेट्रोलसाठी (उदा. E20 किंवा त्याहून अधिक) डिझाइन केलेली नसतात. इथेनॉल पाणी शोषून घेते, ज्यामुळे इंजिनच्या अंतर्गत भागांना गंज लागण्याची किंवा पाईप्स खराब होण्याची शक्यता असते.

**मर्यादित साठवणूक क्षमता:** इथेनॉल हवेतील आर्द्रता (ओलावा) लगेच शोषून घेते. त्यामुळे त्याची साठवणूक आणि वाहतूक करण्यासाठी विशेष काळजी घ्यावी लागते.

**थोडक्यात सांगायचे तर:** इथेनॉल हे पर्यावरणासाठी आणि देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी एक उत्तम पाऊल आहे. मात्र, जुन्या गाड्यांमध्ये याचा मर्यादित वापर करणे आणि अन्नधान्य उत्पादनावर परिणाम न होऊ देता इथेनॉल बनवणे हे यापुढील मोठे आव्हान असेल.


## देशात विकासाची गंगा: प्रगती आणि आव्हानांचा वेध

'विकासाची गंगा' हा शब्दप्रयोग जेव्हा आपण ऐकतो, तेव्हा आपल्या डोळ्यांसमोर आधुनिक पायाभूत सुविधा, डिजिटल क्रांती आणि आर्थिक प्रगतीचे चित्र उभे राहते. जशी पवित्र गंगा नदी आपल्या प्रवाहाने संपूर्ण भूमी सुजलाम् सुफलाम् करते, तसेच देशातील विकासाचा प्रवाह समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणे म्हणजे खऱ्या अर्थाने 'विकासाची गंगा' वाहणे होय.

गेल्या काही दशकांत भारताने विविध क्षेत्रांत केलेली घोडदौड नक्कीच कौतुकास्पद आहे. या विकासाच्या गंगेचे प्रामुख्याने तीन प्रवाह आपल्याला दिसून येतात:

**१. पायाभूत सुविधा आणि डिजिटल क्रांती :** आज देशात नॅशनल हायवेचे जाळे, वंदे भारत सारख्या आधुनिक ट्रेन्स आणि विमानतळांचा विस्तार वेगाने होत आहे. यामुळे कनेक्टिव्हिटी वाढली असून व्यापाराला गती मिळाली आहे. दुसरीकडे, डिजिटल इंडिया मोहिमेमुळे आज अगदी ग्रामीण भागातही भाजी विक्रेत्यापासून ते मोठ्या मॉलपर्यंत 'यूपीआय' (UPI) द्वारे सेकंदात व्यवहार होत आहेत. इंटरनेटच्या सुविधेमुळे शिक्षण आणि बँकिंग सेवा प्रत्येकाच्या हातातील मोबाईलमध्ये पोहोचल्या आहेत.

**२. आर्थिक आणि औद्योगिक प्रगती :** 'मेक



इन इंडिया' आणि 'स्टार्टअप इंडिया' सारख्या उपक्रमांमुळे देशात उद्योजकतेची नवी लाट आली आहे. आज भारत ही जगातील एक प्रमुख अर्थव्यवस्था म्हणून उदयास येत आहे. तंत्रज्ञान, औषध निर्माण (Pharma), आणि संरक्षण क्षेत्रात देश स्वावलंबी बनण्याच्या दिशेने पावले टाकत आहे.

**३. सामाजिक कल्याणकारी योजना :** तळागाळातील लोकांपर्यंत विकास पोहोचवण्यासाठी अनेक योजना राबवल्या जात आहेत. 'आयुष्मान भारत' अंतर्गत मोफत आरोग्य उपचार, 'उज्वला योजने'द्वारे गॅस जोडणी, आणि 'पंतप्रधान आवास योजने'तून गरिबांना पक्की घरे मिळत आहेत. यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे राहणीमान सुधारण्यास मदत झाली आहे.

**आव्हानांचे गढूळ पाणी:** विकास अजून कुठे पोहोचायचा आहे? विकासाची ही गंगा वाहत असतानाच, समाजातील काही घटक अजूनही या प्रवाहापासून दूर आहेत, हेही तितकेच सत्य आहे.

बेरोजगारी आणि कौशल्य विकास: पदव्या असूनही हाताला काम नसलेल्या तरुणांची संख्या मोठी आहे. शिक्षण पद्धती आणि उद्योगांना आवश्यक असणारे कौशल्य यामध्ये मोठी दरी आहे. **शेतकरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्था:** पायाभूत सुविधा शहरांमध्ये वेगाने वाढत असल्या, तरी ग्रामीण भागात अजूनही शेतीला आधुनिकतेची जोड आणि योग्य बाजारपेठ मिळणे गरजेचे आहे.

**पर्यावरणाचा समतोल:** विकासाच्या नावाखाली होणारी जंगलतोड आणि प्रदूषण रोखणे हे मोठे आव्हान आहे. पर्यावरण पूरक (Sustainable) विकास नसेल, तर ही विकासाची गंगा प्रदूषित व्हायला वेळ लागणार नाही.

**निष्कर्ष :** "खरा विकास तोच, जो केवळ आकड्यांमध्ये नाही, तर माणसाच्या जीवनात बदल घडवतो." देशात विकासाची गंगा नक्कीच वाहत आहे, पण ती कुठेतरी अडखळत किंवा काही ठराविक भागातच केंद्रित न राहता, प्रत्येक झोपडीपर्यंत आणि प्रत्येक हाताला काम देण्यापर्यंत पोहोचली पाहिजे. जेव्हा देशातील शेवटच्या नागरिकाला सन्मानाचे जीवन, उत्तम शिक्षण आणि आरोग्य मिळेल, तेव्हाच ही विकासाची गंगा खऱ्या अर्थाने तृप्त झाली असे म्हणता येईल. त्यासाठी शासन आणि नागरिक या दोघांनीही जबाबदारीने पुढे येणे गरजेचे आहे.

३
सिटी न्यूज अकोला
शुक्रवार, दि. १७ जुलै २०२६
Web. http://epaper:citynewssuperfast.com

# पातूरमध्ये 'भाजपा-एम आय एम' चर्चेला उधाण

## सोशल मीडियावर आरोप-प्रत्यारोपांची रणधुमाळी

**पातूर :** पातूर नगराध्यक्ष निवडणुकीनंतर भाजपाच्या प्रसिद्धीपत्रकावरून सोशल मीडियात जोरदार चर्चा रंगली असून, विरोधकांनी भाजपावर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. "भाजपाचे केवळ दोन नगरसेवक असताना उमेदवाराला दहा मते कशी मिळाली?" असा सवाल करत उर्वरित आठ मते नेमकी कुठून आली, याचे स्पष्ट उत्तर देण्याची मागणी केली जात आहे.

सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या पोस्टमध्ये, भाजपाने "कोणाकडेही पाठिंबा मागितला नव्हता" असा दावा केला असला, तरी मग एम आय एम कडून मतदान का झाले, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. "पाठिंबा मागितला नव्हता तर तो मिळाला कसा? यामागे नेमका हेतू काय होता?" अशी विचारणा करण्यात येत असून, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याची मागणीही होत आहे. याचबरोबर, "विचारधारेच्या विरोधात पाठिंबा मागितला नाही" असे सांगणाऱ्या भाजपाने, जर क्रॉस व्होटिंग झाले असेल तर संबंधितांवर पक्षांतर्गत कारवाई का केली नाही, असा मुद्दाही उपस्थित करण्यात आला आहे. विरोधकांकडून "बाहेरून विरोध आणि आतून सेटिंग" किंवा आर्थिक देवाणघेवाणीच्या शक्यतेचाही आरोप करण्यात येत असून, त्याची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी सोशल मीडियावर जोर धरत आहे. दरम्यान, क्रॉस व्होटिंग करणाऱ्या आणि मदत करणाऱ्या सर्वांवर संबंधित पक्षांनी तातडीने कारवाई करावी, अन्यथा "भाजपा + MIM युती"ची चर्चा पातूरकरांच्या मनातून पुसली जाणार नाही, अशी भूमिका अनेक सोशल मीडिया पोस्टमधून व्यक्त केली जात आहे. या सर्व घडामोडींमुळे पातूरमधील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापले असून, आरोप-प्रत्यारोपांमुळे सोशल मीडियावर चर्चेला मोठे उधाण आले आहे. मात्र, या आरोपांबाबत संबंधित पक्षांकडून अधिकृत आणि सविस्तर स्पष्टीकरण येणे अद्याप बाकी आहे.

# कावड मार्गावर भाविकांसाठी आवश्यक सुविधा उभारा

## जिल्हाधिकारी वर्षा मीना यांचे निर्देश

प्रतिनिधी १६ जुलै



**अकोला :** देशभरात नावलौकिक मिळवलेला कावड उत्सव श्रावण महिन्यात साजरा होत असून या लोकोत्सवादरम्यान कावड यात्रेच्या मार्गावर पथदिवे, पिण्याचे पाणी ,स्वच्छतागृहे, रुग्णवाहिका आणि वैद्यकीय पथके व आवश्यक सुविधा उभाराव्यात. सर्व विभागांनी समन्वयाने कार्य करीत कावड उत्सव मंगलमय व उत्साहपूर्ण वातावरण पार पाडावा, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे दिले.

कावड यात्रा नियोजनाबाबत विविध कावड मंडळांच्या प्रतिनिधींची बैठक जिल्हाधिकारी मीना यांच्या अध्यक्षतेत नियोजनभवनात झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अनय नावंदर,महापालिका आयुक्त सुनील लहाने, पालखी व कावड उत्सव समितीचे अध्यक्ष राजेश भारती, शिवभक्त मंडळ चे अध्यक्ष सुनील गरड, पप्पू मोरवाल, कार्याध्यक्ष तरुण बघेरे, विठ्ठल गाडे, राजू बुंदेले, विजय जामनिक, दिलीप नायसे, संतोष पांडे, गोपाल नागपुरे, चंद्रकांत सावजी, निलेश देव

अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी, निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी व कावड मंडळांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

श्रीमती मीना म्हणाल्या की,कावड मार्गांवर सीसीटीव्ही, ड्रोन कॅमेरे व जिल्हाधिकारी कार्यालयात २४ तास नियंत्रण कक्ष कार्यरत राहणार आहे.कावड मार्गावर शिवभक्तांसाठी आवश्यक त्या सुविधा पुरविण्यात येणार असून वैद्यकीय कक्ष कार्यरत राहणार आहेत. यासह अकोट मार्गावरून जलाभिषेक साठी येणाऱ्या शिवभक्तांसाठी पुरेशा व्यवस्था करण्यात येणार असून श्रावण महिन्यातील कावड पालखी उत्सव, व धारगड येथील यात्रा दरम्यान सर्व विभागांनी आवश्यक त्या सुविधा पुरवाव्यात, गांधीग्राम येथील घाटावरील कामे त्वरित पूर्ण करावी मनपा आयुक्त लहाने म्हणाले, कावड मार्गावर आरोग्य, अग्निशमन, वीज, पाणीपुरवठा तसेच अन्य आपत्कालीन सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील.

जिप मुख्य कार्यकारी अधिकारी नावंदर म्हणाले की कावड उत्सव काळामध्ये मनपा क्षेत्रात १० रुग्णवाहिका व १० आरोग्य पथके, अकोट मार्गावर पाच रुग्णवाहिका व आरोग्य पथके तसेच धारगड यात्रेसाठी आरोग्य पथके पूर्ण वेळ कार्यरत राहणार आहेत.

पोलीस अधीक्षक चांडक म्हणाले की, कावड उत्सव दरम्यान प्रत्येक कावड मंडळासाठी २४ तास पोलीस पथकाची नेमणूक करण्यात येणार आहे.उत्सवा दरम्यान गांधीग्राम येथे येणाऱ्या शिवभक्तांसाठी उपहारगृह व पिण्याच्या पाण्याची दुकाने खुली राहतील, पार्किंग व्यवस्था करण्यासंदर्भात प्रशासनाकडून आवश्यक ती कारवाई केली जाईल, उत्सवा दरम्यान सर्व शिवभक्तांनी सामंजस्याने कार्य करावे लेझर लाईटचा कुठेही वापर होऊ नये याची काळजी घ्यावी.. महिला कावड उत्सवासाठी महिला पोलीस पथक कार्यरत राहणार आहेत.

श्रावण महिन्यात १७ ऑगस्ट रोजी पहिला श्रावण सोमवार, २४ ऑगस्ट रोजी दुसरा श्रावण सोमवार, ३१ ऑगस्ट रोजी तिसरा श्रावण सोमवार (श्री क्षेत्र धारगड यात्रा) तसेच ७ सप्टेंबर रोजी चौथा श्रावण सोमवार असून या दिवशी अकोला शहर व ग्रामीण भागात कावड व पालखी मिरवणुका निघणार आहेत. या कालावधीत मोठ्या संख्येने शिवभक्त गांधीग्राम येथील पूर्णा नदी पात्राजवळ एकत्र येतात. मध्यरात्रीनंतर कावडधारी पूर्णा नदीचे पवित्र जल कावडीत भरून अकोला शहरातील श्री राजराजेश्वर मंदिरात नेऊन भगवान महादेवांच्या पिंडीवर जलाभिषेक करतात.

# धोंडी धोंडी पाणी दे, बळीराजाचं संकट टाळू दे

प्रतिनिधी १७ जुलै



**मुर्तीजापुर :** महाराष्ट्राच्या समृद्ध लोकसंस्कृतीचे प्रतीक असलेली 'धोंडी' ही पारंपरिक प्रथा भाजप जनसंपर्क कार्यालयात उत्साहात पार पडली. ग्रामीण भागात पावसासाठी वरुणराजाला साकडं घालण्याची ही प्राचीन परंपरा आजही श्रद्धेने जपली जात आहे.

आ हरीश पिंपळे यांनी पारंपरिक पद्धतीने धोंडीला अंघोळ घालून पावसाचे स्वागत करण्यात आले. बदलत्या हवामानामुळे शेतकरी बांधव अनेक संकटांना सामोरे जात आहेत. या पार्श्वभूमीवर "मुबलक पाऊस पडू दे, बळीराजाचे संकट दूर होऊ दे आणि राज्यातील प्रत्येक कुटुंब सुखी-समृद्ध राहू दे," अशी मनोभावे प्रार्थना वरुणराजाच्या चरणी केली. विदर्भात यंदा पावसाने दडी मारल्याने शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. वेळेवर पाऊस न झाल्यामुळे अनेक ठिकाणी पेरलेली पिके करपू लागली असून दुबार पेरणीचे संकट उभे ठाकले आहे. आधीच वाढलेला शेतीचा खर्च, महागडी बियाणे, खतांचे वाढते दर आणि निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांची चिंता दिवसेंदिवस वाढत आहे. या पार्श्वभूमीवर मूर्तिजापूर शहरासह परिसरातील अनेक गावांमध्ये पावसासाठी पारंपरिक 'धोंडी' मागण्याची प्रथा पुन्हा सुरू झाली आहे. महिला, लहान मुले आणि शेतकरी गावोगावी फिरून "धोंडी धोंडी पाणी दे, साय माय पिकू दे..." असा गजर करत वरुणराजाला साकडे घालत आहेत. अनेक गावांमध्ये नागरिकही उत्स्फूर्तपणे या परंपरेत सहभागी होत असून चांगल्या पावसासाठी सामूहिक प्रार्थना केली जात आहे. यंदाच्या पावसातील मोठ्या खंडामुळे सोयाबीन, तूर, कापूस आदी खरीप पिकांवर विपरीत परिणाम झाला आहे. पाऊस आणखी लांबल्यास उत्पादनात मोठी घट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दुबार पेरणीची वेळ आल्यास शेतकऱ्यांवर अतिरिक्त आर्थिक भार पडणार असल्याने त्यांची चिंता अधिकच वाढली आहे.

# पीएमश्री मनपा व प्राथमिक सेमी इंग्लिश मुलांची शाळा क्र. 07 रामदासपेठ शाळेच्या विद्यार्थ्यांची गगन भरारी

प्रतिनिधी १७ जुलै



**अकोला :** रामदासपेठ येथील पीएमश्री मनपा व प्राथमिक सेमी इंग्लिश मुलांची शाळा क्र. ०७ च्या विद्यार्थ्यांनी पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती परिक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केले आहे. या शाळेतील शिष्यवृत्ती परिक्षेमध्ये बसलेल्या विद्यार्थ्यांचा निकाल शंभर टक्के लागलेला आहे. विद्यार्थ्यांची कठोर मेहनत आणि वर्गशिक्षिका कु. नयना कृष्णराव गोटे यांचे उत्कृष्ट मार्गदर्शन यांच्या बळावर हा कौतुकास्पद टप्पा गाठलेला आहे.

शिष्यवृत्ती परिक्षेला बसलेले एकूण ३२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. व त्यापैकी शाळेतील इयत्ता पाचवीचे २७ विद्यार्थी प्राविण्य श्रेणीमध्ये आले. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या घवघवीत यशामुळे शाळेतील विद्यार्थी व त्यांचे पालक उल्हासीत झाले.

तसेच तालक्यामधुन प्रथम श्रेणी मध्ये कु. खुशी उमेश शिरसाठ ही विद्यार्थीनी येऊन शिक्षण क्षेत्रामध्ये आपले अव्वल स्थान सिद्ध केले. या यशाचे संपुर्ण श्रेय इयत्ता पाचवीच्या वर्गशिक्षिका कु. नयना कृष्णराव गोटे यांना आहे. त्यांनी ह्या विद्यार्थ्यांचा शिष्यवृत्ती वर्ग घेऊन उत्कृष्ट मार्गदर्शन केले. विद्याथ्यानी कठोर मेहनत घेऊन यशोशिखर गाठले व शाळेचा मान वृद्धींगत केला. त्यामुळे सगळीकडे नयना कृष्णराव गोटे मॅडम व उत्तीर्ण तसेच प्राविण्यप्राप्त विद्यार्थी, व तालुक्यातुन प्रथम येणारी विद्यार्थीनी कु. खुशी उमेश शिरसाठ ह्या सर्वांचे कौतुक होत आहे.

शिष्यवृत्ती क्लासला कु. नयना कृष्णराव गोटे मॅडम सोबत भावना अजय इटकीकर मॅडम यांनी सहकार्य करून मार्गदर्शन केले. या यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक शिक्षणाधिकारी श्री. हरिश्चंद्र इटकर सरांनी केले. तसेच शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री. राजेश गावंडे, शाळेच्या मुख्याध्यापिका कु. नयना कृष्णराव गोटे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले व शुभेच्छा दिल्या. शाळेत घेतलेला सराव, अनुभवी शिक्षकवृंदांचे वेळोवेळी मिळणारे मार्गदर्शन, शाळेच्या मुख्याध्यापिका यांचे सतत मिळणारे प्रोत्साहन, आईवडिलांचे आशीर्वाद हेच यशाचे गमक आहे. या यशामुळे शाळेतील संपूर्ण पालकवर्ग, शाळा व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापिका मंदा खिरोडकर, शाळेचा संपूर्ण स्टाफ व विद्यार्थ्यांनी आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

या यशामुळे शाळा परिसरातील पालकवर्ग आकृष्ट होऊन शाळेतील नवीन विद्यार्थ्यांच्या अॅडमिशन वाढल्या हे विशेष.

# चोरीतील 72 हजार 200 रुपयांचा मुद्देमाल फिर्यादीस परत



प्रतिनिधी १७ जुलै

**मुर्तीजापुर :** शहर पोलिसांनी चोरीच्या गुन्ह्याचा यशस्वी तपास करून ७२ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करत तो न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर फिर्यादीच्या ताब्यात परत दिला.

मुर्तीजापुर शहर पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणातील फिर्यादी महेंद्र अनिल आगळेकर (वय ३५), सरोदे प्लॉट, जुनी वस्ती, मुर्तिजापूर यांच्या घरातून सोन्या-चांदीचे दागिने व इतर मौल्यवान वस्तू चोरीला गेल्या होत्या.

या गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी प्रदीप उत्तमराव इंगळे (वय ४७, , मलाईपुरा जुनी बस्ती मुर्तिजापूर, आणि विजय मधुकर रोडे (वय २९, धात्रा शिंदे, ता. मुर्तिजापुर या दोन आरोपींना अटक करून त्यांच्याकडून चोरीतील मुद्देमाल जप्त केला. पोलिसांनी जप्त केलेल्या मुद्देमालामध्ये खालील वस्तूंचा समावेश आहे – एक सोन्याचे लॉकेट, एक सोन्याची चेन, सोन्याची कानातील दागिने, सोन्याची बाळी, सोन्याचे बेसर, एक जोडी चांदीचे पायातील दागिने, तसेच एक चांदीचे लॉकेट. या सर्व वस्तूंची एकूण किंमत ७२ हजार २०० रुपये इतकी असून न्यायालयीन आदेशानंतर त्या फिर्यादी महेंद्र अनिल आगळेकर यांना परत करण्यात आल्या. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस निरीक्षक धर्मेंद्र जोशी यांच्या नेतृत्वाखाली मुक्ताईनगर शहर पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे चोरीतील मुद्देमाल परत मिळाल्याने फिर्यादीने पोलिसांचे आभार मानले असून, या कारवाईचे परिसरात कौतुक होत आहे.

# हिवरखेड येथे मोकाट जनावरांचा बंदोबस्त करा



**हिवरखेड :** येथील मेन रोडवर येणाऱ्या जाणाऱ्या प्रवासी वर्गाला नाहकच त्रास सहन करावा लागत आहे,या प्रवाशी वर्गामध्ये शाळकरी विद्यार्थी, व्यापारी, शेतकरी, व शासकीय कर्मचाऱ्यांचा सुद्धा समावेश आहे, या सर्वांना मोकाट गुरांचा सामना करूनच पुढचे पाऊल उचलावे लागत आहे, ज्याचे हे मोकाट गुरे आहेत, ते शांत झोपा आपल्या घरी काढतात,आणि इतरांच्या झोपा मात्र उडवतात असे हे चित्र हिवरखेड मेनरोडवर पाहण्यास मिळते, हे गुरे मुख्य ठिकाणी आपले अतिक्रमण तयार करून बिनधास्त बसतात, मोठ मोठी वाहने गुरांच्या उठण्याची वाट बघत ट्रॅफिक जाम करतात, अशी बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे, ही मोठी प्रवाशी वर्गांची समस्या या सबंधित विभागे लक्ष देऊन हा मोकाट गुरांचा होणारा त्रास नाहीसा करावा जेणेकरून येणाऱ्या जाणाऱ्याला सोयीचे होईल अशी मागणी प्रवाशी वर्ग करीत आहे,

# मतदारांनी एस आय आर चे फॉर्म भरून द्यावे

**अकोला :** भारतीय निवडणूक आयोगाच्या स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन मोहीमे अंतर्गत नवीन नोंदणी करु इच्छिणाऱ्या तसेच सर्व जुन्या मतदारांनी गणना प्रपत्र भरून देणे आवश्यक आहे. मतदार याद्या अद्ययावत आणि अचूक ठेवण्यासाठी हि मोहीम राबविण्यात येत आहे. बुथ लेव्हल अधीकारी प्रत्येक घरी जाऊन गणना प्रपत्र, चे वाटप करत आहेत. ज्यांना गणना प्रपत्र मिळाले नाही, त्यांनी बुथ लेव्हल अधिकाऱ्याशी संपर्क साधून घेऊन जावे. गणना प्रपत्र भरून देण्याची शेवटची तारीख २९ जुलै आहे. भरून न दिल्यास नवीन मतदार नोंदणी होणार नाही तसेच जुन्या मतदारांचे नाव वगळले जावू शकते.


# कार्यालय नगर पंचायत बार्शिटाकळी

## जाहीर सुचना

बार्शिटाकळी शहरातील नागरीकांना सुचित करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने राज्यातील शासकीय जमिनी वरील दिनांक 01/01/2011 पुर्वी रोजी किंवा त्यापुर्वीची निवासी अतिक्रमणे पुढील अटी व शर्तीच्या अधिन राहुन नियमित करण्याचा निर्णय घेतला आहे.

**1) पात्रतेचे निकष :-** अतिक्रमणाचा दिनांक केवळ 01/01/2011 रोजी किंवा त्यापुर्वी झालेली आणि सध्या अस्तित्वात असलेली निवासी अतिक्रमणेच नियमित केली जातील. अतिक्रमण हे केवळ स्वतःच्या निवासा साठी असावे.

**पुरावे :-** 01/01/2011 पुर्वीच्या पुराव्यासाठी मतदार यादीतील नाव, विज बिल, मालमत्ता कराची पावती किंवा इतर शासकीय दस्तऐवज (शिधापत्रिका वगळून) तसेच मागील एक वर्षाचा रहिवासाचा पुरावा देणे अनिवार्य आहे.

**2) महत्वाच्या अटी व मर्यादा :-** क्षेत्र मर्यादा जास्तीत जास्त 1500.00 चौ. फुट पर्यंतचे क्षेत्र नियमित करता येईल. एका कुटुंबाला एकच लाभ संपुर्ण महाराष्ट्र राज्यात एका कुटुंबाला (पती, पत्नी व अविवाहीत मुले) केवळ एकच अतिक्रमण नियमित करुन घेता येईल. नियमित केलेली जागा पुढील 5 वर्षा पर्यंत विक्री अथवा भाड्याने देणे कींवा हस्तांतरीत करता येणार नाही.

**3) शुल्क रचनाः** 500.00 चौ. फुट क्षेत्रापर्यंत सर्व निवासी अतिक्रमणे विनामुल्य नियमित केली जातील. 500.00 ते 1500.00 चौ. फुट पहिल्या 500 चौ. फुटानंतरच्या जास्तीच्या क्षेत्रासाठी बाजार मुल्याच्या 10 टक्के रक्कम कब्जे हक्क म्हणुन आकारली जाईल. 1500.00 चौ. फुटापेक्षा जास्त 1500.00 चौ. फुटांवरील अतिक्रमणे नियमित केले जाणार नाही. ते निष्कासित (काढुन टाकले) जाईल.

**4) अर्ज करण्याची प्रक्रिया व मुदत :** अर्ज सादर करण्यासाठी नागरीकांनी नगर पंचायत कार्यालयातुन अर्ज प्राप्त करुन सदर अर्ज मुख्याधिकारी यांच्या नावे आवश्यक कागदपत्रासह बांधकाम विभाग, नगरपंचायत बार्शिटाकळी यांच्याकडे सादर करावेत.

**अंतिम मुदतः** अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत 31 डिसेंबर 2026 पर्यंत आहे या दिनांकापर्यंत अर्ज सादर न करणाऱ्याची व इतर अपात्र अतिक्रमणे निष्कासित केली जातील.

**विशेष सुचनाः** नदीपात्र नाले, सार्वजनिक रस्ते, वने (Forest Land) आणि धोकादायक क्षेत्रातील अतिक्रमणे या योजने अंतर्गत नियमित केली जाणार नाहीत. नागरीकांनी दिलेल्या अर्जातील माहिती खोटी आढळल्यास ते अपात्र ठरवले जातील.

| स्वाक्षरी/- | स्वाक्षरी/- | स्वाक्षरी/- |
| --- | --- | --- |
| अखतर खातुन अलिमोददीन<br>अध्यक्ष<br>नगर पंचायत बार्शिटाकळी | सै. अबरार सै. मिर<br>उपाध्यक्ष<br>नगर पंचायत बार्शिटाकळी | (राहूल कंकाळ)<br>मुख्याधिकारी<br>नगर पंचायत बार्शिटाकळी |


# अकोट-अकोला व अकोट-शेगाव रस्त्यांच्या दुरवस्थेविरोधात

# देवरी फाटा येथे चक्का जाम



वि. प्रतिनिधी १७ जुलै

**अकोट :** अकोट-अकोला आणि अकोट-शेगाव हे तालुक्यातील प्रमुख मार्ग सध्या मोठमोठ्या खड्डयांमुळे धोकादायक बनले असून नागरिकांचा प्रवास जीवघेणा झाला आहे. रस्त्यांच्या दुरवस्थेकडे प्रशासनाचे सातत्याने होत असलेले दुर्लक्ष आणि निष्क्रिय कारभाराच्या निषेधार्थ सक्षम सामाजिक संघटनेच्या वतीने शुक्रवारी देवरी फाटा येथे चक्का जाम आंदोलन करण्यात आले.

संघटनेचे अध्यक्ष अनिकेत नानाभाऊ पोतले यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात शेकडो सामाजिक कार्यकर्ते, युवक, वाहनचालक आणि नागरिक सहभागी झाले होते. आंदोलनादरम्यान प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. रस्त्यांची तात्काळ दुरुस्ती करून नागरिकांना सुरक्षित प्रवासाची हमी द्यावी, अशी प्रमुख मागणी आंदोलकांनी केली.

आंदोलनकर्त्यांनी सांगितले की, अकोट-अकोला व अकोट-शेगाव मार्गावरील मोठमोठ्या खड्डयांमुळे वाहनचालकांना दररोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. विशेषतः दुचाकीस्वार, विद्यार्थी, शेतकरी तसेच रुग्णवाहिकांना या मार्गावरून जाताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रस्त्यावरील भेगा आणि खड्डयांमुळे अपघातांची मालिका सुरू असून अनेकांना जीव गमवावा लागला आहे, तर काहीजण कायमचे अपंगत्व आले असल्याचा आरोपही आंदोलकांनी केला.

याबाबत संबंधित विभागाला वारंवार निवेदने देऊनही केवळ आश्वासनांपलीकडे कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. अनेक वेळा पाठपुरावा करूनही प्रशासनाने दुर्लक्ष केल्यामुळे अखेर रस्त्यावर उतरून चक्का जाम आंदोलन करण्याचा निर्णय घ्यावा लागल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

"रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करा, अन्यथा यापेक्षाही तीव्र आंदोलन छेडण्यात येईल," असा इशाराही सक्षम सामाजिक संघटनेच्या वतीने देण्यात आला. सर्व खड्डे त्वरित बुजवून मार्ग वाहतुकीसाठी सुरक्षित करावेत, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

चक्का जाम आंदोलनामुळे काही काळ अकोट-अकोला आणि अकोट-शेगाव मार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. त्यामुळे वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. घटनेची माहिती मिळताच पोलिस प्रशासन घटनास्थळी दाखल झाले. आंदोलकांशी चर्चा करून परिस्थिती नियंत्रणात आणण्यात आली आणि नंतर वाहतूक सुरळीत करण्यात आली.या आंदोलनादरम्यान दहीहंडा पोलिस स्टेशनचे ठाणेदार गोपाल ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांचा चोख बंदोबस्त होता.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शुक्रवार, दि. १७ जुलै २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# 'मी पोलीस आहे...' म्हणत वृद्धाला गंडा; सोन्याची अंगठी लंपास

## उमरखेडजवळ भरदिवसा तोतया पोलिसाची चलाखी; विश्वास संपादन करून फसवणूक

प्रतिनिधी १७ जुलै




**उमरखेड** : पुसद रोडवरील दहागाव फाट्याजवळ गुरुवारी सकाळी एका तोतया पोलिसाने 'मी पोलीस आहे' अशी बतावणी करत ६१ वर्षीय वृद्धाची सोन्याची अंगठी लंपास केल्याची धक्कादायक घटना घडली. भरदिवसा झालेल्या या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

उत्तम गोविंद फाळके (वय ६१, रा. मरसूळ, ता. उमरखेड) हे दुचाकीने उमरखेडकडे येत असताना सकाळी साडेदहाच्या सुमारास दहागाव फाट्याजवळ एका अनोळखी व्यक्तीने त्यांना अडवले. संबंधिताने स्वतःला पोलीस असल्याचे सांगत या मार्गावर लुटारूंचा वावर असल्याने हातातील सोन्याची अंगठी काढून ठेवण्याचा सल्ला दिला. त्यानंतर अंगठी आणि मोबाईल घेऊन ते बॅगेत ठेवत असल्याचे सांगितले व वाटेत बॅग उघडू नका, अशी सूचना केली.

फाळके यांनी त्याच्यावर विश्वास ठेवून पुढील प्रवास सुरू ठेवला. मात्र घरी पोहोचल्यानंतर बॅग उघडून पाहिली असता मोबाईल मिळाला; पण सोन्याची अंगठी गायब असल्याचे आढळले. त्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले.

घटनेनंतर फाळके यांनी उमरखेड पोलीस ठाण्यात धाव घेऊन माहिती दिली. या प्रकाराच्या धक्क्याने त्यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. वृत्त लिहिपर्यंत या प्रकरणी अधिकृत गुन्हा दाखल झाला नव्हता. दरम्यान, उमरखेड पोलीस सीसीटीव्ही फुटेज व अन्य तांत्रिक पुराव्यांच्या आधारे तोतया पोलिसाचा शोध घेत आहेत.

# दिग्रसच्या सूतगिरणीचा धागा थेट चीनमध्ये; उत्कृष्ट गुणवत्तेला जागतिक बाजारपेठेची पसंती

प्रतिनिधी १७ जुलै




**दिग्रस** : दिग्रस येथील रामदास आठवले मागासवर्गीय कापूस उत्पादक सहकारी सूतगिरणीने अल्पावधीतच जागतिक बाजारपेठेत आपला ठसा उमटविला आहे. गिरणीत उत्पादित झालेल्या उत्कृष्ट दर्जाच्या धाग्याचा पहिला कंटेनर जहाजमार्गे थेट चीनला रवाना करण्यात आला. यानिमित्त संस्थापक अध्यक्ष मिलिंद मानकर यांच्या हस्ते कंटेनरचे पूजन करण्यात आले. २०१९ मध्ये नोंदणी झालेली ही सूतगिरणी कोरोनामुळे निर्माण झालेल्या अडचणींवर मात करत २०२५ मध्ये उत्पादनाखाली आली. महाराष्ट्रातील गेल्या दशकात नोंदणीकृत सूतगिरण्यांपैकी उत्पादन सुरू करणारी ही मोजक्याच प्रकल्पांपैकी एक असल्याचा दावा व्यवस्थापनाने केला आहे. उत्कृष्ट गुणवत्तेमुळे चिनी तज्ज्ञांनी विविध तांत्रिक चाचण्यांनंतर या धाग्याला मान्यता दिली असून, त्यानंतरच निर्यातीसाठी करार करण्यात आला. सूतगिरणीचे अध्यक्ष महेंद्र मानकर यांनी सांगितले की, मागील १८ महिन्यांत सुमारे साडेपाच हजार टन सूत उत्पादन झाले आहे. सध्या २५ हजार चात्यांच्या क्षमतेपैकी १६,५०० चाते कार्यरत असून दररोज १० ते १२ टन सूत तयार होते. दोन शिफ्टमध्ये २०० हून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत. लवकरच पूर्ण क्षमतेने उत्पादन सुरू झाल्यानंतर आणखी रोजगारनिर्मिती होणार आहे.

गिरणीच्या यशामागे आधुनिक यंत्रसामग्री, व्यवस्थापकीय संचालक बी. एल. बेहरा यांचे नेतृत्व, तांत्रिक चमू, कर्मचारी आणि संचालक मंडळाचे योगदान असल्याचेही मानकर यांनी नमूद केले. राज्य सरकार आणि संबंधित लोकप्रतिनिधींच्या सहकार्यामुळे हा प्रकल्प साकार झाल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी संचालक प्रा. मधुकर वाघमारे, अविनाश कुलदीपके, धर्मराज गायकवाड, जनरल मॅनेजर एल. आर. बेहरा, श्रेयश मानकर तसेच कर्मचारी व कामगार उपस्थित होते.

# काठीने मारहाण

प्रतिनिधी १७ जुलै

**कळंब** : तालुक्यातील आष्टी येथे शेणखत टाकण्याच्या जागेवरून वाद झाला. यात एकाने काठीने हल्ला करून जखमी केले. ही घटना १५ जुलै रोजी दुपारी घडली.

या प्रकरणी विनोद विठ्ठलराव कोवे यांच्या तक्रारीवरून कळंब पोलिसांनी विविध कलमानुसार मारहाणीचा गुन्हा दाखल केला.

# बैल चोरीच्या गुन्ह्यांचा पर्दाफाश; सात आरोपी जेरबंद



प्रतिनिधी १७ जुलै

## १०.०५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**पांढरकवडा** : पांढरकवडा पोलिसांनी दोन वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या बैल चोरीच्या गुन्ह्यांचा छडा लावत सात आरोपींना अटक केली आहे. आरोपींकडून चोरीत वापरलेली वाहने, मोबाईल आणि नगदीसह सुमारे १० लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

७ जून रोजी मांगुर्डा शिवारातून दोन बैल (किंमत ४० हजार रुपये) तर ८ जुलै रोजी घनमोड शिवारातून दोन बैल (किंमत ५० हजार रुपये) चोरीला गेल्याची तक्रार पांढरकवडा पोलिस ठाण्यात दाखल झाली होती. या दोन्ही गुन्ह्यांचा तपास गुन्हे प्रकटीकरण पथकाने गोपनीय माहिती व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे केला.

तपासादरम्यान राकेश देविदास चौधरी, घ्घुप (घुप) अतुल ठमके, सय्यद आकीब सय्यद अकबर खान, शाहरुख खान, अभिषेक विजय मडावी, अभय उर्फ दुर्लभ जयपाल मिश्रा आणि आदिलाबाद येथील शफी मुदस्सीर यांना या प्रकरणात आरोपी करण्यात आले.

पोलिसांच्या माहितीनुसार, चोरी केलेले बैल कत्तलीसाठी विकण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले असून, त्याबदल्यात मिळालेली ९० हजार रुपयांची नगदी जप्त करण्यात आली.

याशिवाय आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेली एक मोटारसायकल, दोन चारचाकी वाहने, पाच मोबाईल असा एकूण १०.०५ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी रॉबीन बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली पांढरकवडा पोलीस ठाण्याचे ठाणेदार एल. डी. तावरे व गुन्हे प्रकटीकरण पथकाने केली. पुढील तपास सुरू आहे.

# 'रामजन्मभूमी'च्या गैरव्यवहाराची चौकशी करा; काँग्रेसचे आंदोलन

प्रतिनिधी १७ जुलै



**वणी** : श्री रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टमधील कथित आर्थिक गैरव्यवहार, सार्वजनिक देणगी निधीचा कथित गैरवापर, फौजदारी विश्वासघात, गुन्हेगारी कट आणि पुरावे नष्ट करण्याच्या आरोपांच्या निषेधार्थ वणी येथे काँग्रेसच्या वतीने आंदोलन करण्यात आले. आंदोलनात अखिल भारतीय काँग्रेस कमिटी व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे महासचिव सहभागी झाले.

आंदोलनादरम्यान संबंधितांवर तातडीने गुन्हा दाखल करून निष्पक्ष व सखोल चौकशी करण्यात यावी, दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, तसेच आवश्यक असल्यास अंमलबजावणी संचालनालय (ईडी) मार्फतही तपास करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली.

जनतेच्या श्रद्धेशी आणि विश्वासाशी संबंधित देणगी निधीच्या वापराबाबत कोणताही कथित गैरव्यवहार खपवून घेतला जाणार नाही. या प्रकरणातील सत्य समोर येऊन दोषींना कठोर शिक्षा व्हावी, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. दरम्यान, या प्रकरणातील आरोप आंदोलनकर्त्यांनी केले असून, त्याबाबत अधिकृत चौकशी अथवा न्यायालयीन निष्कर्ष अद्याप समोर आलेले नाहीत.

# कर्जबाजारी व नापिकीला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या

प्रतिनिधी १७ जुलै



**कळंब** : कळंब तालुक्यातील पिंपळशेडा (डोंगरखर्डा) येथील 60 वर्षीय शेतकरी शामराव सोनबा जुनघरे यांनी सोमवारी सायंकाळी घराच्या अंगणातील झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शामराव जुनघरे हे शेतीवर उदरनिर्वाह करत होते. मात्र, सलग दोन वर्षे नापिकी झाल्याने त्यांच्यावर आर्थिक संकट ओढवले होते. यंदा बियाणे व पेरणीसाठी आवश्यक निधी उपलब्ध नसल्याने शेती करणेही शक्य झाले नव्हते. मागील वर्षीचे कर्ज फेडण्याची चिंता आणि पुढील शेतीचे नियोजन कसे करायचे, या विवंचनेत ते होते. या मानसिक तणावातून त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याची माहिती कुटुंबीयांनी दिली. त्यांच्या पश्चात आई, पत्नी चंद्रकला, मुलगे विनोद व विनायक तसेच एक मुलगी असा परिवार आहे. घटनेची माहिती मिळताच कळंब पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविला. पुढील तपास सुरू आहे.

# चापर्डा येथील ज्ञानभूमीत ओशो ध्यान-विपश्यना शिबिर

## देशभरातील ९० शिबिरार्थींचा सहभाग

प्रतिनिधी १७ जुलै



**यवतमाळ** : कळंब तालुक्यातील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या चापर्डा येथील ज्ञानभूमीत गुरुवारी (१६ जुलै) सायंकाळी ओशो ध्यान-विपश्यना शिबिराचे उद्घाटन उत्साहात झाले. डॉ. बोधी अशोक आणि स्वामी बोधी आनंद यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना, आजच्या धकाधकीच्या आणि स्पर्धात्मक जीवनात मानसिक शांतता व अंतर्मनाच्या जागृतीसाठी ध्यानाची नितांत आवश्यकता असल्याचे प्रतिपादन करण्यात आले. आचार्य रजनीश (ओशो) यांनी भारतीय अध्यात्म, बुद्ध, महावीर, श्रीकृष्ण, मीरा, भगवद्गीता तसेच विविध धर्मतत्त्वांवर केलेल्या चिंतनाचा उल्लेखही करण्यात आला.

देशभरातील सुमारे ९० शिबिरार्थींनी या ध्यान-विपश्यना शिबिरात सहभाग नोंदविला आहे. शिबिरात भगवान गौतम बुद्ध यांच्या दुःख, त्याची कारणे आणि दुःखनिवारणाचा मार्ग या तत्त्वज्ञानासह भारतीय तत्त्वज्ञानातील विविध पैलूंवर मार्गदर्शन केले जाणार आहे. उद्घाटन सत्राचे संचालन रोशनी यांनी केले, तर बोधिप्रकाश यांनी आभार मानले. शिबिराच्या व्यवस्थापनासाठी बोधी उद्धवराव भालेराव, माजी आयुक्त पौर्णिमा काटकर आणि दीपक ब्राह्मणे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर' अभियानाची तयारी

प्रतिनिधी १७ जुलै

## उपविभागातील सर्व विभागप्रमुखांची आढावा बैठक



**उमरखेड** : 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर' अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उमरखेड उपविभागातील सर्व विभागप्रमुखांची आढावा बैठक गुरुवारी उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

यवतमाळ जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार २६ जुलै रोजी उमरखेड-महागाव विधानसभा मतदारसंघात एकदिवसीय समाधान शिबिराचे आयोजन करण्यात येणार असून, त्याच्या नियोजनावर बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

राज्य शासनाच्या निर्देशानुसार माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त २२, २५ किंवा २६ जुलै या तीन दिवसांपैकी एका दिवशी प्रत्येक विधानसभा मतदारसंघात समाधान शिबिर आयोजित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार ८२-उमरखेड विधानसभा मतदारसंघासाठी २६ जुलै रोजी सकाळी १० वाजता उमरखेड येथील राजस्थानी भवन येथे शिबिर होणार आहे. या पार्श्वभूमीवर राजे छत्रपती संभाजी महाराज नगर परिषद उद्यानातील सभागृहात आयोजित बैठकीत विविध विभागांनी शिबिरासाठी आवश्यक तयारी, नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवा, प्रलंबित प्रकरणांचा निपटारा आणि विभागनिहाय समन्वय याबाबत सूचना देण्यात आल्या. बैठकीस तहसीलदार आर. यू. सुरडकर, गटविकास अधिकारी किरण कोळपे, नगर परिषद मुख्याधिकारी डॉ. अजय कुरवाडे, तालुका कृषी अधिकारी अभय वडकुते, उपविभागीय विद्युत अभियंता प्रशांत आंबटकर, तालुका आरोग्य अधिकारी राजू दुबे, भूमी अभिलेख उपअधीक्षक बाळू आडे यांच्यासह उमरखेड व महागाव तालुक्यातील विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

# जागतिक लोकसंख्या दिन उत्साहात

प्रतिनिधी १७ जुलै

**यवतमाळ** : वाढत्या लोकसंख्यीच्या पार्श्वभूमीवर कुटुंब नियोजनाबाबत जनजागृती करण्यासाठी जिल्हा आरोग्य विभागाच्या वतीने जागतिक लोकसंख्या दिन उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्हा परिषदेच्या वसंतराव नाईक सभागृहात झालेल्या जिल्हास्तरीय कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले.

यंदाच्या "दोन जन्मात अंतर, कुटुंब सुदृढ निरंतर" या घोषवाक्याअंतर्गत ११ ते १८ जुलै दरम्यान जिल्हाभर विविध जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार आहेत. कुटुंब नियोजनाच्या विविध पद्धतींचा प्रचार, आरोग्यविषयक मार्गदर्शन आणि नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यावर भर दिला जाणार आहे. उद्घाटनप्रसंगी डॉ. सुभाष ढोले यांनी, "सुखी आणि सक्षम कुटुंबासाठी कुटुंब नियोजनाची साधने स्वीकारणे ही काळाची गरज असून, प्रत्येक नागरिकापर्यंत आरोग्य सुविधा आणि जनजागृती पोहोचविण्यासाठी आरोग्य विभाग कटिबद्ध आहे," असे सांगितले.

कार्यक्रमात निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. रमेश मांडण यांनी माता-बाल आरोग्य सुधारण्यासाठी आणि लोकसंख्या स्थिर राखण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज अधोरेखित केली. तसेच जिल्ह्यातील कुटुंब कल्याण कार्यक्रमांचा आढावा घेऊन आरोग्य विभागाच्या विविध योजनांची माहिती आरोग्य कर्मचारी व अधिकाऱ्यांना देण्यात आली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# जिल्ह्यात दीड लाख स्मार्ट मीटर

प्रतिनिधी १७ जुलै

## १८७ ग्राहकांच्या शंकांचे मेळाव्यात निरसन



**यवतमाळ** : यवतमाळ जिल्ह्यात महावितरणकडून आतापर्यंत १ लाख ६० हजार २६७ वीज ग्राहकांच्या घरी स्मार्ट मीटर बसविण्यात आले असून, त्याबाबत निर्माण झालेले गैरसमज दूर करण्यासाठी आयोजित सुसंवाद मेळाव्यांना चांगला प्रतिसाद मिळाला. जिल्ह्यातील १९ उपविभागांमध्ये झालेल्या या मेळाव्यांमध्ये केवळ १८७ ग्राहकांनी शंका उपस्थित केल्या असून, अधिकाऱ्यांनी प्रात्यक्षिकांसह त्यांचे समाधान केल्याचा दावा महावितरणने केला आहे.

१३ जुलै रोजी आयोजित मेळाव्यांमध्ये स्मार्ट मीटरचे कार्य, अचूक व पारदर्शक बिलिंग, वीज वापराची नोंद आणि ग्राहकांना होणारे फायदे याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. यासोबतच वीज बिलांबाबतच्या तक्रारीही ऐकून त्यांचे तत्काळ निराकरण करण्यात आले.

यावेळी अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, वाढीव वीज बिलासाठी स्मार्ट मीटर जबाबदार नसून, घरातील वाढता वीज वापर किंवा वायरिंगमधील अर्थ लिकेज (विद्युत गळती) ही प्रमुख कारणे असू शकतात. स्मार्ट मीटरमुळे अशी गळती त्वरित लक्षात येते आणि संभाव्य विद्युत अपघात टाळण्यास मदत होते. त्यामुळे ग्राहकांनी घरातील अर्थिंगची तपासणी करून आवश्यक असल्यास आरसीबी (RCB) यंत्रणा बसवावी, असा सल्लाही देण्यात आला.

सोशल मीडियावरील अपूर्ण किंवा दिशाभूल करणाऱ्या माहितीवर विश्वास न ठेवता, कोणतीही शंका असल्यास थेट महावितरणशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# रस्ते योजनेच्या सहअध्यक्षपदी प्रकाश पाटील देवसरकर

## महसूल मंत्र्यांकडून नियुक्ती जाहीर; शेत-पाणंद रस्त्यांच्या कामांना मिळणार गती

प्रतिनिधी १७ जुलै

**उमरखेड** : मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजनेच्या उमरखेड-महागाव विधानसभा क्षेत्राच्या सहअध्यक्षपदी माजी आमदार प्रकाश पाटील देवसरकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी १५ जुलै रोजी शासन निर्णयाद्वारे राज्यातील विधानसभा क्षेत्रनिहाय सहअध्यक्षांच्या नियुक्त्या जाहीर केल्या असून त्यामध्ये देवसरकर यांच्या नावाचा समावेश आहे.

१४ डिसेंबर २०२५ रोजी शासनाने मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजना सुरू केली. शेतकऱ्यांना शेतापर्यंत सर्व ऋतूंमध्ये सहज पोहोचता यावे, शेतीमालाची वाहतूक सुलभ व्हावी आणि ग्रामीण पायाभूत सुविधांना चालना मिळावी, या उद्देशाने ही योजना राबविण्यात येत आहे. योजनेच्या अंमलबजावणीत अधिक सुसूत्रता आणण्यासाठी विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीला सहअध्यक्ष नियुक्त करण्याचे अधिकार महसूल मंत्र्यांना देण्यात आले होते.

### 'पाणंद रस्त्यांचे जाळे पूर्ण करण्यावर भर'

■ "मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजना सुरू केली आहे. ही योजना ग्रामीण भागासाठी अत्यंत उपयुक्त असून पुढील चार वर्षांत उमरखेड विधानसभा मतदारसंघातील पाणंद रस्त्यांची कामे मोठ्या प्रमाणात पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करणार आहे," असे नवनियुक्त सहअध्यक्ष तथा माजी आमदार प्रकाश पाटील देवसरकर यांनी सांगितले.



उमरखेड तालुक्यात शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सातत्याने भूमिका घेणारे नेते म्हणून प्रकाश पाटील देवसरकर यांची ओळख आहे. माजी आमदार, साखर कारखान्याचे अध्यक्ष, सहकारी बँकेचे संचालक आदी विविध पदांवरील त्यांच्या अनुभवाची दखल घेत त्यांची या महत्त्वाच्या पदावर नियुक्ती करण्यात आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. त्यांच्या नियुक्तीचे शेतकरी, कार्यकर्ते आणि विविध स्तरांतून स्वागत करण्यात येत आहे.

देवसरकर यांनी आपल्या नियुक्तीचे श्रेय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, भाजप जिल्हा समन्वयक नितीन भुतडा आणि आमदार किसनराव वानखेडे यांना दिले.

# गाडगेनगर, नवसारी कचरा स्पॉट व स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सची आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांच्याकडून पाहणी

## समन्वयातून नियोजनबद्ध कामाचे निर्देश

प्रतिनिधी १७ जुलै



**अमरावती:** अमरावती महानगरपालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी गुरुवारी गाडगेनगर परिसर, नवसारी येथील कचरा संकलन स्थळ (कचरा स्पॉट) आणि नवसारी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सची पाहणी करून स्वच्छता, कचरा व्यवस्थापन व सुरू असलेल्या कामांचा आढावा घेतला. सर्व विभागांनी परस्पर समन्वय राखून नियोजनबद्ध पद्धतीने कामे पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

पाहणीची सुरुवात गाडगेनगर येथील संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी पीडीएमसी प्रभागातील नगरसेवक प्रमोद महल्ले यांनी सर्व प्रभागातील नगरसेवकांच्या वतीने महानगरपालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांचे स्वागत केले. तसेच सर्व नगरसेवकांनी परिसरातील विविध नागरी समस्या, स्वच्छता, पायाभूत सुविधा आणि विकासकामांबाबतच्या अडचणी आयुक्तांसमोर मांडल्या. त्यावर संबंधित विभागांनी तातडीने आवश्यक कार्यवाही करून समस्या सोडविण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले.

त्यानंतर परिसरातील स्वच्छता व्यवस्थेची पाहणी करत आयुक्तांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. संत गाडगेबाबा यांच्या स्वच्छतेच्या विचारांचा आदर्श ठेवून शहरातील प्रत्येक परिसर स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी ठेवणे ही महानगरपालिकेसह नागरिकांचीही सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. यानंतर नवसारी येथील कचरा स्पॉटची पाहणी करत त्यांनी कचरा संकलन, विल्हेवाट आणि व्यवस्थापनाच्या कामांचा आढावा घेतला. कचरा साचून राहणार नाही, परिसरात अस्वच्छता निर्माण होणार नाही आणि नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही, यासाठी नियमित देखरेख ठेवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. कचरा व्यवस्थापनाची संपूर्ण प्रक्रिया अधिक प्रभावी आणि शिस्तबद्ध पद्धतीने राबविण्यावर भर देण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

नवसारी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये सुरू असलेल्या कामांची माहिती घेत आयुक्तांनी प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्यास सांगितले.

# स्थानिक ईश दया निराधार केंद्र, येथे हेल्थ चेक अप कॅम्प संपन्न



## पी. आर. पोटे पाटील नर्सिंग महाविद्यालय

प्रतिनिधी १७ जुलै

**अमरावती :** आपल्या विविध नावीन्यपूर्ण उपक्रमातून जनमानसात आपली अनोखी ओळख निर्माण केलेल्या पी. आर. पोटे पाटील नर्सिंग महाविद्यालय, अमरावती तर्फे नर्सिंग अभ्यासक्रमाचे महत्व आणि मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजावित तथा सामाजिक बांधिलकीची जान व्हावी ह्या हेतूने स्थानिक ईश दया निराधार केंद्र, अमरावती येथे दि. ६ जून २०२६ रोजी नर्सिंग अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकडून केंद्रातील निराधार तसेच मानसिक-शारीरिक विकलांग असलेल्या ५७ मुलींची आणि महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

ह्यामध्ये रक्त, थायरॉईड अशा विविध प्रकारच्या महत्वपूर्ण वैद्यकीय चाचण्या निशुल्कपणे करण्यात आल्या. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शेबा शाजी ह्यांच्या संकल्पनेतून आणि संस्थेच्या डॉ. शरयू वानखडे ह्यांच्या वैद्यकीय मार्गदर्शनातून ही आरोग्य तपासणी यशस्वीपणे पार पडली. अशा सामाजिक उपक्रमातून विद्यार्थ्यांना समाज मन आणि त्यांचे आरोग्य कळण्यास मदत होते, असे मत महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शेबा शाजी ह्यांनी ह्यावेळी व्यक्त केले. डॉ. शरयू वानखडे ह्यांनी रुग्णांची तपासणी करीत त्यांना आरोग्याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. सदर कॅम्पच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शेबा शाजी, संस्थेच्या आयुर्वेद महाविद्यालय आणि रुग्णालयातील डॉ. शरयू वानखडे तसेच विविध विभागांचे तंत्रज्ञ, तसेच नर्सिंग महाविद्यालयाचे श्री. आशिष ईंगळे, कु. शुभांगी केळझरे, विद्यार्थ्यांचे व सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

# लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्त राजपूत समाजातील गुणवंतांचा सत्कार

## 25 जुलैपर्यंत नावे नोंदवा; 1 ऑगस्टला जोशी हॉलमध्ये गौरव सोहळा

प्रतिनिधी १७ जुलै



**अमरावती :** महाराणा प्रतापसिंह सार्वजनिक सेवा समिती, अमरावती तर्फे दरवर्षी प्रमाणे यंदाही महान स्वातंत्र्यसेनानी लोकमान्य गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्त राजपूत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

10 वी आणि 12 वी मध्ये 80 टक्के किंवा त्याहून अधिक गुण मिळवलेले, तसेच क्रीडा, साहित्य आणि कला क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेले विद्यार्थी या सत्कारासाठी पात्र आहेत. पदवी स्तरावर वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषी किंवा इतर कोणत्याही शाखेत फर्स्ट क्लास किंवा त्याहून अधिक गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांचाही यात समावेश आहे.

इच्छुक विद्यार्थ्यांनी आपली कागदपत्रे 25 जुलै 2026 पर्यंत ठाकूर फटाका भांडार, गांधी चौक, अमरावती येथे जमा करावीत. अमरावती शहरासह बडनेरा आणि नांदगावपेठ येथील विद्यार्थीही यात सहभागी होऊ शकतात. हा कार्यक्रम 1 ऑगस्ट 2026 रोजी सायंकाळी 5 ते 9 वाजता जोशी हॉल, श्याम चौक येथे होणार आहे. समितीचे अध्यक्ष सुरेशसिंह ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या सोहळ्यात विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह आणि रोख बक्षीस देऊन गौरवण्यात येणार आहे. कार्यक्रमात लोकमान्य टिळकांच्या जीवनावर व्याख्यानही होणार आहे. त्यानंतर भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

समाजातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी यात सहभाग घ्यावा असे आवाहन अध्यक्ष डॉ. जितेंद्रसिंह राजकुमार आणि सचिव प्रा. राकेशसिंह ठाकूर यांनी केले आहे.

# क्रीडा ई-प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन नोंदणी सुरु, घरबसल्या मिळणार डिजिटल प्रमाणपत्र

प्रतिनिधी १७ जुलै

**अमरावती :** महाराष्ट्र राज्यातील गुणवंत खेळाडूंना शासकीय आणि निमशासकीय सेवांमध्ये 5 टक्के आरक्षणाचा लाभ अधिक सुलभ, पारदर्शक आणि जलद गतीने मिळावा यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने 'क्रीडा ई-प्रमाण' ही ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर आधारित अद्ययावत प्रणाली कार्यान्वित केली आहे. ही नवीन प्रणाली ब्लॉकचेन आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित असल्याने बोगस प्रमाणपत्रांना पूर्णपणे आळा बसेल, तसेच माहिती जुळल्यास अवघ्या 24 तासांच्या आत डिजिटल पडताळणी अहवाल खेळाडूंना उपलब्ध होणार आहे.

विशेष म्हणजे आगामी काळातील महाराष्ट्र लोकसेवा आयोग तसेच इतर सर्व शासकीय पदभरतीसाठी अर्ज करताना खेळाडूंना आता या क्रीडा ई-प्रमाणपत्राची प्रत जोडणे अनिवार्य करण्यात आले असून, या प्रमाणपत्राशिवाय खेळाडू संवर्गातून अर्जाचा विचार केला जाणार नाही. ज्या खेळाडूंनी यापूर्वी विभागीय उपसंचालकांकडून प्रमाणपत्रांची पडताळणी करून घेतली आहे, त्यांनाही यापुढे नवीन भरतीसाठी या प्रणालीद्वारे नवीन प्रमाणपत्र तयार करून घेणे बंधनकारक आहे.

या सुविधेचा लाभ घेण्यासाठी पात्र खेळाडूंनी क्रीडा विभागाच्या अधिकृत संकेतस्थळाला (https://sports.maharashtra.gov.in/) भेट देऊन 'आमच्या सेवा' (Our Services) मधील '5% Reservation' या टॅबमध्ये जाऊन आपली एक वेळ नोंदणी (One-Time Registration) पूर्ण करावी. नोंदणीसाठी खेळाडूंनी आपला आधार-संलग्न मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी, आधार कार्डची पीडीएफ आणि क्रीडा स्पर्धेत प्राप्त प्राविण्य प्रमाणपत्राची पीडीएफ फाईल तयार ठेवावी. सध्या कबड्डी, फेन्सिंग, ट्रायथलॉन (2025 ची स्पर्धा), ज्युडो (2024 ची स्पर्धा) आणि कुराश (2017-18 व 2024-25) या खेळांचे अभिलेख ऑनलाईन उपलब्ध असून याच खेळाडूंचे अर्ज स्वीकारले जात आहेत. तर इतर खेळांच्या खेळाडूंनी केवळ नोंदणी करून ठेवावी, त्यांचे अभिलेख अपलोड करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

तांत्रिक अडचणींमुळे ज्या खेळाडूंची माहिती किंवा प्रमाणपत्रे प्रणालीवर दिसत नसतील, त्यांनी आवश्यक तपशीलासह support@kridaepramaan.org या ई-मेलवर आपली तक्रार नोंदवावी, असे आवाहन क्रीडा विभागाकडून करण्यात आले आहे.

# अफाक शेख हत्या प्रकरणात एका आरोपीला 20 जुलैपर्यंत पीसीआर

## दोन अल्पवयीन चौकशीसाठी ताब्यात

प्रतिनिधी १७ जुलै



**अमरावती :** बुधवारी विजय कॉलनीत ताज नगरीतील 22 वर्षे युवक अफाक शेख याची निर्घृण हत्या करण्यात आली होती. विशेष म्हणजे या हत्या प्रकरणात आरोपींनी मृतक अफाकच्या हाताचा पंजा तोडला होता..या प्रकरणातील तीन जणांना गुन्हे शाखेच्या पथकाने वर्धा येथून बुधवारीच सायंकाळी ताब्यात घेतले होते. याप्रकरणी सज्ञान असलेल्या एका आरोपीला पोलिसांनी गुरुवारी न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्याला 20 जुलैपर्यंत पीसीआर (पोलीस कोठडी ) सुनावली आहे.

याप्रकरणी दोन अल्पवयीन युवकांना पोलिसांनी अमरावती शहरातील बाल सुधार गृह येथे पाठवण्यात आल्याची माहिती आहे. शहराला हादरून सोडणारे अफाक खून प्रकरणाने शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सीसीटीव्ही फुटेज मध्ये आलेल्या सर्वांचीच पोलिसांनी बुधवारपासून कसून चौकशी केली. ज्या इंस्टाग्राम ग्रुप वरून हे प्रकरण सुरू झाले. त्या ग्रुपची सुद्धा सायबर पोलिसांनी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून चौकशी केली आहे. पीसीआर दरम्यान या प्रकरणात आणखीन कुणाकुणाचा सहभाग आहे. यासंदर्भाची माहिती सुद्धा लवकरच पोलिसांच्या तपासात पुढे येणार आहे. यातील दोन युवक अल्पवयीन असल्याने गोपनीय पद्धतीने तपास सुरू आहे. तीन जणांना ताब्यात घेतले असून त्यापैकी सज्ञान असलेल्या एका आरोपीला अटक केल्याची माहिती डीसीपी यशवंत सोळंके यांनी आरआरसी शी बोलताना दिली.

# टपाल विभागाच्या सेवानिवृत्ती वेतनधारकांसाठी 24 जुलै रोजी अमरावतीत 'पेन्शन अदालत'

## 23 जुलैपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**अमरावती:** प्रवर अधीक्षक डाकघर, अमरावती विभाग यांच्या वतीने टपाल विभागाच्या सेवानिवृत्ती वेतनधारक आणि कुटुंब सेवानिवृत्ती वेतनधारकांच्या प्रलंबित तक्रारींचे निवारण करण्यासाठी शुक्रवार, दिनांक 24 जुलै2026रोजीसकाळी11वाजता विशेष 'डाक पेन्शन अदालत' चे आयोजन करण्यात आले आहे. ही पेन्शन अदालत अमरावती येथील प्रवर अधीक्षक डाकघर कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. पेन्शन अदालतमध्ये टपाल विभागातून सेवानिवृत्त झालेल्या किंवा सेवेत असताना मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीवेतनाशीसंबंधिततक्रारींचा विचार केला जाईल, ज्यांची महाराष्ट्र आणि गोवा राज्य स्तरावर 3 महिन्यांच्या आत पूर्तता झालेली नाही, शिस्तभंग आणि डी.पी.सी. च्या पुनरावलोकनासाठी प्रलंबित असलेल्या पूर्णपणे कायदेशीर प्रकरणांचा या अदालतीत विचार केला जाणार नाही.यासुविधेचालाभघेण्यासाठी पेन्शनधारकांनी आपली तक्रार केवळ वैयक्तिकरित्या विहित नमुन्यातील अर्जाच्या तीन प्रतींसह प्रवर अधीक्षक डाकघर, अमरावती विभाग, अमरावती (444602) या पत्त्यावर दिनांक 23 जुलै 2026 रोजी किंवा त्यापूर्वी सादर करावी; मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा पेन्शन अदालतमध्ये विचार केला जाणारनाही,असेडाकविभागाकडून कळविण्यातआलेआहे.

# "हिंदुत्वाचा उपदेश देणारे स्वत: दर्ग्यात का जातात?"

प्रतिनिधी १७ जुलै



**अमरावती :** आजकाल काही लोक टीव्ही आणि वृत्तपत्रांच्या माध्यमातून रोज उद्धव ठाकरेंना हिंदुत्वावरून प्रश्न विचारत आहेत. हिंदुत्वाचे प्रमाणपत्र देण्याचा ठेका जणू यांच्याकडेच आहे. असे वक्तव्य शिवसेनेचे नेते प्रवीण हरमकर यांनी व्यक्त केले आहे.

पण प्रश्न हा आहे की, हिंदुत्वाचे मोठे मोठे भाषण करणारे हेच लोक स्वतः दरग्यात जाऊन चादर चढवताना दिसतात. मग खरे हिंदुत्व कुठे आहे? मंदिरात की दर्ग्यात?निवडणुका आल्या की हिंदुत्व आठवते आणि दुसऱ्या दिवशी दर्ग्यात फोटो काढले जातात. हा दुटप्पीपणा महाराष्ट्रातील जनता बघत आहे.

हिंदुत्व म्हणजे दिखावा नव्हे. हिंदुत्व म्हणजे स्वाभिमान, संस्कृती आणि निष्ठा. ज्यांना स्वतःच्या कृतीतून हिंदुत्व सिद्ध करता येत नाही त्यांनी इतरांना प्रश्न विचारू नयेत असे वक्तव्य सुद्धा माजी खासदार नवनीत राणा, व बडनेराच्या आमदार रवी राणा यांच्या बदल शिवसेना शहर प्रमुख माजी विरोधी पक्ष नेता, नगरसेवक प्रवीण हरमकर यांनी केले आहे.

# मातोश्री शासकीय आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलांच्या वसतिगृहात 21 रिक्त जागांसाठी प्रवेश सुरु

प्रतिनिधी १७ जुलै

**अमरावती:** महाराष्ट्र शासनाच्या उच्चशिक्षण विभागामार्फत संचालित मातोश्री शासकीय आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, वलगाव रोड, अमरावती येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रवेशाची दुसरी फेरी सुरू झाली आहे. पहिल्या फेरीनंतर कनिष्ठ महाविद्यालयासाठी ६, महाविद्यालयीन पदवी/पदव्युत्तर विभागासाठी १० आणि तंत्रशिक्षण विभागासाठी ५ अशा एकूण २१ जागा रिक्त आहेत. इच्छुक विद्यार्थ्यांनी वसतिगृहात प्रवेशासाठी प्रवेश अर्ज सादर करावे, असे आवाहन गृहप्रमुख अनिल तसरे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे. या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांच्या पालकांचे सन २०२५-२६ या वर्षातील वार्षिक आर्थिक उत्पन्न रु. १,००,०००/- (अक्षरी : एक लाख रुपये फक्त) किंवा त्यापेक्षा कमी असणे आवश्यक आहे. पात्र विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार व सामाजिक आरक्षणाच्या नियमानुसार प्रवेश देण्यात येणार आहे. प्रवेशित विद्यार्थ्यांना वसतिगृहात निवास व भोजनाची निःशुल्क सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. इच्छुक व गरजू विद्यार्थ्यांनी वसतिगृहाच्या कार्यालयातून सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत विनामूल्य प्रवेश अर्ज प्राप्त करून आवश्यक कागदपत्रांसह तातडीने अर्ज सादर करावेत. रिक्त जागांचा लाभ घेण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी विलंब न करता अर्ज करावेत, असेही वसतिगृह प्रशासनाव्दारे कळविण्यात आले आहे.

# पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा दौरा

**अमरावती:** पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे शुक्रवार, दि. 17 जुलै, रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.

दौऱ्यानुसार पालकमंत्री बावनकुळे हे सकाळी 10 वाजता मोटारीने नागपूर येथून अमरावतीकडे प्रयाण करतील. दुपारी 12 वाजता जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीस उपस्थिती. दुपारी 4.30 वाजता जिल्हा नियोजन समिती सभागृह जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हा नियोजन समितीव्दारा मंजूर निधी अंतर्गत पोर्टेबल टॉयलेट व रेनकोट तसेच जिल्हा क्रीडा निधी अंतर्गत नूतनीकरण करण्यात आलेल्या पोलीस आधुनिक व्यायाम शाळेचा उद्घाटन समारंभ कार्यक्रमास उपस्थिती.

# अमराठी भाषिक वाहनचालकांसाठी मराठी भाषा शिकवणी कार्यशाळा उत्साहात

## आरटीओ कार्यालयाचे आयोजन

प्रतिनिधी १७ जुलै



**अमरावती :** महाराष्ट्र शासन परिवहन विभाग, राज्य मराठी विकास संस्था, कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघ यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या 'महाराष्ट्र माझा, मराठी माझी संवाद भाषा अभियान-२०२६' अंतर्गत अमराठी भाषिक वाहनचालकांसाठी आयोजित करण्यात आलेली मराठी भाषा शिकवणी कार्यशाळा प्रादेशिक परिवहन कार्यालयांच्या सभागृह येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार या होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून कोकण मराठी साहित्य परिषदेच्या सचिव प्रा. दीपा ठाणेकर, ज्येष्ठ साहित्यिका डॉ. अनुपमा उजगरे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी नंदकिशोर काळे तसेच ऑटो युनियनचे अध्यक्ष नितीन मोहोड उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. मान्यवरांनी मराठी भाषेचे महत्त्व अधोरेखित करत प्रवाशांशी सुसंवाद साधण्यासाठी मराठी भाषेचा प्रभावी वापर आवश्यक असल्याचे सांगितले. सेवा देताना आत्मविश्वासपूर्ण संवाद आणि भाषेतील सौजन्य यामुळे नागरिकांचा विश्वास संपादन करण्यास मदत होते, असे मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यशाळेत सहभागी झालेल्या ऑटो रिक्षा व टॅक्सी चालकांनी मराठी भाषेतील दैनंदिन व्यवहारातील शब्द, वाक्यरचना आणि संवाद कौशल्य यांची माहिती आत्मसात केली. राज्यातील विविध भागांतून येणाऱ्या प्रवाशांशी अधिक प्रभावी व सुलभ संवाद साधता यावा, मराठी भाषेविषयी आदर व आत्मीयता वाढावी तसेच सेवेचा दर्जा उंचवावा, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला वाहनचालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावेळी मार्गदर्शन करताना प्रा. दीपा ठाणेकर म्हणाल्या, "मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा असून राज्यात व्यवसाय करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला मराठी भाषा अवगत असणे आवश्यक आहे. या अभियानांतर्गत अमराठी भाषिक वाहनचालकांना मराठी भाषेचे प्रशिक्षण दिले जाणार असून संवाद कौशल्य विकसित करण्यावर विशेष भर दिला जाईल. प्रशिक्षणानंतर मूल्यमापन चाचणी घेऊन यशस्वी सहभागींचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात येईल." प्रादेशिक परिवहन कार्यालय, अमरावती यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेचे उपस्थित अधिकारी, मान्यवर आणि वाहनचालकांनी स्वागत केले. भविष्यातही अशा उपयुक्त व लोकाभिमुख कार्यशाळांचे आयोजन नियमितपणे करण्यात यावे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
शुक्रवार, दि. १७ जुलै २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com



# मलकापुरात बालकामगारा विरोधात धडक कारवाई

प्रतिनिधी १७ जुलै

## तीन बालकामगारांची सुटका : आरोपीवर गुन्हा दाखल

**मलकापूर:** बालकामगार व किशोरवयीन कामगार अधिनियमांतर्गत जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखालील संयुक्त कृती दलाने मलकापूर शहरात १५ जुलै रोजी कारवाई करत दोन आस्थापनांमधून तीन बालकामगारांची मुक्तता केली. संबंधित आस्थापना चालकांविरुद्ध मलकापूर शहर पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आला.

विशेष तपासणी मोहिमेदरम्यान शिवाजीनगर परिसरातील मल्टी ऑटो पार्ट्स अँड सर्व्हिस या आस्थापनात एक बालकामगार काम करत असल्याचे आढळून आले. तसेच मोमीनपुरा, पारपेठ येथील ख्वाजा गरीब नवाज गॅरेज या

आस्थापनात दोन बालकामगार काम करत असल्याचे कृती दलाच्या निदर्शनास आले. त्यानंतर पथकाने तिन्ही बालकामगारांची सुटका करून आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली. या प्रकरणी दोन्ही आस्थापना चालकांविरुद्ध बालकामगार व किशोरवयीन कामगार अधिनियमांतर्गत मलकापूर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुकाने निरीक्षक योगेश गोटे यांच्या नेतृत्वाखालील पथकात दुकाने निरीक्षक राजेश वणारे, सतीश देशमुख, अशोक डोळस, महिला व बालविकास विभागाचे नीलेश चौथनकर तसेच मलकापूर शहर पोलिस ठाण्याचे कर्मचारी शेख मतीन व कैलास सोनोने सहभागी होते.

### बालकामगार कायद्याच्या अंमलबजावणीसाठी कृती दल कार्यरत

बालकामगार प्रतिबंधक कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली कृती दल कार्यरत आहे. या पथकाकडून विविध आस्थापनांवर वेळोवेळी छापा टाकून बालकामगारांचा शोध घेतला जातो. या कारवाईत दुकान निरीक्षक, संबंधित विभागाचे अधिकारी व पंच उपस्थित होते. नागरिकांना कोणत्याही आस्थापनात बालकामगार आढळल्यास तातडीने प्रशासनाला माहिती देण्याचे आवाहन केले आहे.

# बळीराजाला पावसाची प्रतीक्षा

प्रतिनिधी १७ जुलै



**खामगाव :** यावर्षी रोहिणी व मृग नक्षत्र कोरडे गेले. त्यानंतर आर्द्रा नक्षत्रात जिल्हयात कमी-जास्त प्रमाणात पाऊस होवून शेतकऱ्यांनी पेरणी केली. मात्र अनेक दिवसांपासूनपावसाने दडी मारल्याने शेतकरी पावसाची प्रतीक्षा करीत आहे.

जिल्ह्यात यंदा घाटावरील तालुक्यात जून महिन्याच्या शेवटी जोरदार पाऊस झाला. तर घाटाखालील तालुक्यात अत्यल्प स्वरूपाचा पाऊस पडला. घाटावरील काही तालुक्यात दररोजच्या पावसामुळे पेरणीस विलंब झाला. तर घाटाखालील तालुक्यात पेरणीयोग्य पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी पेरणी केली. मात्र अनेक दिवसांपासून पावसाने दडी मारल्यामुळे सिंचनाची व्यवस्था असणारे शेतकरी पिके वाचविण्यासाठी धडपड करीत आहेत. तर कोरडवाहू शेतातील पिके पावसाअभावी माना टाकत आहेत. त्यामुळे शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान जिल्ह्यात अनेक भागात बोगस बियाण्यांमुळे शेतात सोयाबीन उगवले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे. सरकारने कर्ज माफिची घोषणा करून ३० जूनपर्यंत शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याची घोषणा केली होती.

मात्र किचकट अटींमुळे अद्यापही कर्जमाफीचा लाभ मिळाला नाही. तर आता अहिल्याबाई होळकर कर्जमाफी योजनेची व्याप्ती वाढवून काही अटी शिथिल करून ३० जुलैपर्यंत कर्जमाफी होईल, असा निर्णय सरकारने घेतला. सद्या शेतकऱ्यांनी स्वतः जवळील पैसे व खासगी सावकारांकडून कर्ज काढून कशीबशी पेरणी केली. मात्र बोगस बियाणे व पावसाअभावी पेरणी खोळंबली आहे. त्यामुळे यंदाचा खरीप हंगाम धोक्यात आला असून शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून येत आहे.

# स्वाभिमानी'च्या नेतृत्वात 'शेतकरी जन आक्रोश संसद'

प्रतिनिधी १७ जुलै

## बोगस बियाणेप्रकरणी गुन्हे दाखल करण्याची मागणी

**खामगांव:** बोगस बियाण्यांमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचा आरोप करत संबंधित बियाणे कंपन्या व कृषी केंद्र चालकांवर तातडीने फौजदारी कारवाई करण्यासाठी गुरुवारी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या नेतृत्वाखाली 'शेतकरी जन आक्रोश संसद' भरविण्यात आली. यानंतर विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांसह उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देऊन दोषींवर त्वरित गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अमोल पाटील यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन पार पडले.

यावेळी शेतकरी आणि विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी सहभागी झाले होते. यावेळी मराठा पाटील समितीचे संस्थापक अध्यक्ष गजानन ढगे, रवी जैन, राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे तालुकाध्यक्ष संजय बगाडे, मोहन घुईकर, स्वप्नील ठाकरे, काँग्रेस शेतकरी संघटनेचे युवक जिल्हाध्यक्ष प्रकाश भिसे, श्याम मोरखाडे, ऋषी पहाड, शिवा लगर, आकाश पाटील, प्रतीक मिरगे, अविनाश कुटे तसेच विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### निकृष्ट बियाण्यांमुळे आर्थिक फटका

निवेदनात खामगाव परिसरातील अनेक शेतकऱ्यांची बोगस बियाण्यांमुळे आर्थिक फसवणूक झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. निकृष्ट बियाण्यांमुळे पिकांचे मोठे नुकसान होऊन लाखो रुपयांचा फटका बसला असून अनेक शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याचे नमूद करण्यात आले.

# विवाहितेचे अपहरण करुन टिनशेडमध्ये डांबले; गुन्हा दाखल

प्रतिनिधी १७ जुलै

## केस कापून आरोपी पसार; हिवरखेड ठाणे हद्दीतील घटना

**खामगाव:** हिवरखेड पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका गावात ३२ वर्षीय विवाहितेचे घरातून अपहरण करून तिला शेतातील टिनशेडमध्ये डांबून ठेवल्याची धक्कादायक घटना १५ जुलै रोजी उघडकीस आली आहे.

या प्रकरणी महिलेच्या तक्रारीवरून हिवरखेड पोलिसांनी एका नामनिर्देशित आरोपीसह एका अनोळखी व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १४ जुलैच्या रात्री संबंधित महिला घरी झोपलेली असताना घराच्या दरवाजावर थाप मारण्यात आली.दरवाजा उघडताच तोंडाला रूमाल बांधलेल्या दोघांनी तिला जबरदस्तीने घराच्या मागील बाजूस नेले. तेथे तिचे हातपाय बांधून तिला गावातीलच एका शेतातील टिनशेडमध्ये नेण्यात आले.

टिनशेडमध्ये नेल्यानंतर एका आरोपीने तिचे केस कापल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या दरम्यान एका आरोपीच्या तोंडावरील रुमाल निघाल्याने तो गावातील सुरेश लोखंडकार असल्याचे महिलेने ओळखल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर दोन्ही आरोपींनी महिलेला टिनशेडमध्ये हातपाय बांधून ठेवले आणि बाहेरून कुलूप लावून तेथून पसार झाले. या घटनेनंतर महिलेने हिवरखेड पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी सुरेश लोखंडकार व एका अनोळखी व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस हेडकॉन्स्टेबल रामेश्वर राठोड करीत आहेत.

# जिल्ह्याचे सहपालकमंत्री संजय सावकारे यांचा दौरा

प्रतिनिधी १७ जुलै

**बुलढाणा :** वस्त्रोद्योग मंत्री तथा जिल्ह्याचे सहपालकमंत्री संजय वामन सावकारे हे शुक्रवार १७ जुलै रोजी नांदुरा जि. बुलढाणा दौऱ्यावर येत आहे.

त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार शुक्रवार १७ जुलै रोजी सकाळी ११.३० वाजता भुसावळ येथून नांदुरा येथे आगमन व जिगाव धरण प्रकल्पाकडे प्रयाण. दुपारी १२ वाजता जिगाव धरण प्रकल्प येथे आगमन व प्रकल्पाची पाहणी. दुपारी १२.३० वाजता जिगाव धरण प्रकल्प येथून शासकीय विश्रामगृह नांदुराकडे प्रयाण व दुपारी १ वाजता शासकीय विश्रामगृह नांदुरा येथे भाजपा पदाधिकारी व आ. चैनसुख संचेती यांच्यासोबत विविध विषयावर बैठक. दुपारी १.३० वाजता शासकीय विश्रामगृह येथून रेल्वेस्टेशनकडे प्रयाण. दुपारी २ वाजता नांदुरा रेल्वेस्टेशनचे ७५ वे अमृत स्थानकाचे उद्घाटन सोहळ्यास उपस्थिती. दुपारी २.३० वाजता नांदुरा रेल्वेस्टेशन येथून भुसावळकडे प्रयाण करतील.

# जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन 20 जुलैला

प्रतिनिधी १७ जुलै

**बुलढाणा :** दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी शासन निर्णयानुसार जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. त्याअनुषंगाने जूलै महिन्याचा महिला लोकशाही दिन सोमवार २० जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात येणार आहे. पिडीत महिलांनी महिला लोकशाही दिनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महिला व बालविकास अधिकारी अमोल डिघुळे यांनी केले.

# पुनर्विकसित नांदुरा स्थानकासह 75 स्थानके राष्ट्राला समर्पित करणार

प्रतिनिधी १७ जुलै

## अमृत भारत स्थानक योजना

**नांदुरा :** पंतप्रधान नरेंद्र मोदी १७ जुलै रोजी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे अमृत भारत स्थानक योजना (ABSS) अंतर्गत पुनर्विकसित करण्यात आलेली ७५ रेल्वे स्थानके राष्ट्राला समर्पित करणार आहेत. यामध्ये मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागातील नांदुरा रेल्वे स्थानकाचाही समावेश आहे.

नांदुरा हे मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागातील एक महत्त्वाचे रेल्वे स्थानक असून येथे दररोज सरासरी ४, ५४५ प्रवासी प्रवास करतात. तसेच २६ गाड्यांचे संचालन होते. १०.६३ कोटी खर्चाच्या मंजूर निधीतून या स्थानकाचा विकास करण्यात आला असून त्यामुळे प्रवासी सुविधांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. सुरक्षितता, सुलभता आणि एकूणच प्रवासाचा अनुभव अधिक उत्तम झाला आहे. हावडा-मुंबई मुख्य रेल्वेमार्गावरील हे स्थानक प्रवासी, एक्स्प्रेस व सुपरफास्ट गाड्यांद्वारे प्रवासी, कृषी बाजारपेठा आणि औद्योगिक क्षेत्रांना देशातील प्रमुख शहरांशी जोडणारे महत्त्वाचे केंद्र आहे.

अमृत भारत स्थानक योजनेअंतर्गत नांदुरा रेल्वे स्थानकाचा सर्वंकष पुनर्विकास करण्यात आला असून यात प्रवासी सुविधा, सुलभता, सुशोभीकरण आणि कार्यक्षमतेवर विशेष भर देण्यात आला नांदुरा रेल्वे स्टेशन आहे.

योजनेअंतर्गत पूर्ण करण्यात आलेली प्रमुख कामे पुढीलप्रमाणे आहेतः आधुनिक स्थानक इमारत, परिभ्रमण क्षेत्राचा विकास, अद्ययावत प्रवासी सुविधा, नवीन प्लॅटफॉर्म शेड, सुरक्षितता व सुलभतेसाठी विशेष सुविधा, ज्यामध्ये कमी उंचीचे आरक्षण/तिकीट बुकिंग काउंटर, दिव्यांग अनुकूल स्वच्छतागृहे, कमी उंचीवर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच दिव्यांगांसाठी राखीव वाहनतळ यांचा समावेश आहे. पंतप्रधानांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली भारतीय रेल्वेने अमृत भारत स्थानक योजनेअंतर्गत देशातील १,३३७ रेल्वे स्थानकांची पुनर्विकासासाठी निवड केली आहे. यामध्ये महाराष्ट्रातील १३२ स्थानकांचा समावेश असून त्यापैकी १५ स्थानकांचा पुनर्विकास पूर्ण करून ती राष्ट्राला समर्पित करण्यात आली आहेत. १५ स्थानके पुढीलप्रमाणे आहेत :

मुंबई विभागः चिंचपोकळी, परळ, वडाळा रोड, माटुंगा, शाहाड, पुणे विभाग :-केडगाव, लोणंद, भुसावळ विभाग : लासलगाव, देवळाली, सावदा, धुळे, मुर्तीजापूर, दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, नागपूर विभाग: चांदा फोर्ट, इतवारी, आमगाव, उर्वरित स्थानकांच्या पुनर्विकासाची कामे वेगाने सुरू आहेत. अमृत भारत स्थानक योजनेद्वारे भारतीय रेल्वे देशभरातील स्थानकांचा आधुनिक तंत्रज्ञान, शाश्वत विकास, सर्वसमावेशक सुलभता आणि स्थानिक वारशाशी सुसंगत असा विकास करत आहे. या योजनेमुळे लाखो प्रवाशांना अधिक दर्जेदार प्रवासाचा अनुभव मिळणार असून देशाच्या पायाभूत सुविधांच्या विकासाला तसेच आर्थिक प्रगतीलाही नवी चालना मिळणार आहे.

### प्रवाशांना होणारे लाभ

अधिक आरामदायी प्रवास, सुरक्षितता आणि संरक्षेत वाढ, ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगांसाठी अधिक सुलभ सुविधा, आधुनिक प्रतीक्षालयांची उपलब्धता, स्वच्छतेत सुधारणा, प्रवाशांच्या हालचाली अधिक सुलभ, गर्दीचे प्रभावी व्यवस्थापन, स्थानक परिसराचे आकर्षक सुशोभीकरण, अधिक सोयीस्कर वाहनतळ व स्थानकापर्यंत सुधारित पोहोच.

# भाजी विक्रेत्यांच्या समस्यांवर नगरपरिषदेत आढावा बैठक

## विविध मागण्यांवर चर्चा; तोडगा काढण्याचे आश्वासन

प्रतिनिधी १७ जुलै

**खामगाव :** पाटबंधारे उपविभाग, शहरातील रस्त्यांवर व्यवसाय करणाऱ्या भाजी विक्रेत्यांच्या विविध समस्या आणि मागण्यांबाबत नगरपरिषद कार्यालयात आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत विक्रेत्यांच्या दैनंदिन व्यवसायात येणाऱ्या अडचणी, व्यवसायासाठी जागेची उपलब्धता तसेच इतर प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. नगराध्यक्ष अपर्णा फुंडकर यांनी बैठकीत उपस्थित भाजी विक्रेत्यांच्या अडचणी प्रत्यक्ष जाणून घेतल्या. विक्रेत्यांना कोणत्याही अडथळ्याशिवाय आणि सन्मानाने व्यवसाय करता यावा, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. तसेच विक्रेत्यांच्या प्रलंबित मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेऊन लवकरात लवकर योग्य तोडगा काढला जाईल, असे आश्वासनही यावेळी देण्यात आले. बैठकीत प्रशासन आणि विक्रेत्यांमध्ये समन्वय ठेवून शहरातील वाहतूक, नागरिकांची गैरसोय आणि विक्रेत्यांचे हित या तिन्ही बाबींचा समतोल राखत नियोजन करण्यावर भर देण्यात आला.

# मानव-वन्य प्राणी संघर्ष टाळण्यासाठी विशेष प्रयत्न करणार-जमीर शेख

प्रतिनिधी १७ जुलै

## गिरडा गावाला भेट देऊन गावकऱ्यांशी साधला संवाद

**बुलढाणा :** अगदी डोंगराच्या काठावर असल्याने अनेक वन्यप्राणी गावात येतात. भविष्यात मानव व वन्यजीव संघर्ष होऊ नये, यासाठी विशेष प्रयत्न करणार असून ज्या ठिकाणी आवश्यक असेल तिथे तार कुंपण लावण्यात येणार असल्याची माहिती बुलढाणा उप वनसंरक्षक जमीर मुनीर शेख यांनी गिरडा गावकऱ्यांशी बोलताना दिली आहे.

बुलढाणा तालुक्यातील गिरडा हे अजिंठा पर्वत रांगेवर वसलेले आहे. संपूर्ण डोंगराळ भाग असल्याने येथे जंगलात मोठ्या प्रमाणात बिबट, अस्वल, तडस सारखे हिंस्त्र प्राण्यांचा अधिवास आहे. अनेकवेळा हे वन्यप्राणी गावात येतात. अशात गावातील २ गोठ्यात येऊन बिबट्याने ९ शेळ्या व१ वासरू ठार केले. यात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झालेले आहे. सतत बिबट्या गावात येत असून माणसावर हल्ला होण्याची शक्यता नकारता येत नाही. या गंभीर बाबीवर लक्ष केंद्रित करत डीएफओ जमीर शेख यांनी १६ जुलै रोजी दुपारी गिरडा गावाला भेट देऊन पाहणी करीत गावकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी जंगलाच्या दरीला लागून असलेल्या भागाचे निरीक्षण केले, तसेच आवश्यक असलेल्या ठिकाणी तारकुंपण करता येईल जेणे करून वन्य प्राणी गावात येणार नाही आणि भविष्यात मानव वन्यप्राणी संघर्ष देखील टाळता येईल अशी इच्छा व्यक्त केली.

वन्यप्राण्यावर लक्ष ठेवण्यासाठी गावाजवळ कॅमेरे लावण्याचे त्यांनी निर्देश दिले. यावेळी बुलढाणा वनपरिक्षेत्र अधिकारी सुनील वाकोडे, वनपाल प्रदीप मुंडे, सरपंचपूत्र अजय गायकवाड, उपसरपंच योगेश गायकवाड, पोलीस पाटील गजानन चांदळकर, ज्ञानेश्वर पोफळे, अशोक गायकवाड, रविंद्र गायकवाड, वनरक्षक समाधान झोटे, कैलास तराल, विक्रम राऊत, अमोल हिवाळे, चालक संदीप मडावी, पुंजाजी जवरे उपस्थित होते.

# यंदा खरीप हंगामात कांदा लागवड वाढण्याची शक्यता; दरवाढ झाल्याचा सकारात्मक परिणाम!

प्रतिनिधी १७ जुलै

## दर स्थिर राहिल्यास हंगाम ठरणार फायदेशीर



**खामगाव:** मागील काही दिवसांत कांद्याच्या दरात झालेल्या सुधारामुळे यंदाच्या खरीप हंगामात कांदा लागवडीचे क्षेत्र वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. बाजारात मिळणाऱ्या समाधानकारक दरांमुळे शेतकऱ्यांचा कांदा पिकाकडे पुन्हा कल वाढताना दिसत आहे. सध्या चांगल्या प्रतीच्या कांद्याला प्रति क्विंटल २३०० ते २६०० रुपये दर मिळत असल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. मागील हंगामात कमी दरामुळे तोटा सहन करावा लागलेल्या अनेक शेतकऱ्यांनी यंदा कांदा लागवडीकडे वळण्याचा निर्णय घेतला आहे.

कृषी तज्ज्ञांच्या मते, सध्याचे दर टिकून राहिल्यास कांदा लागवडीचे क्षेत्र लक्षणीयरीत्या वाढू शकते. मात्र, हवामानातील बदल, पावसाचे अनियमित आगमन आणि वाढता उत्पादन खर्च या घटकांचा परिणामही लक्षात घेणे आवश्यक आहे. पुढील काही दिवसांत बियाणे पेरणीला सुरुवात होणार असून, शेतकरी नियोजनबद्ध पद्धतीने लागवडीची तयारी करीत आहेत. दरम्यान, बाजारातील दर स्थिर राहावेत आणि उत्पादनाला योग्य बाजारपेठ मिळावी, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत.

### कांद्याच्या दरात सुधारणा

मागील काही दिवसांत कांद्याच्या बाजारभावात लक्षणीय वाढ झाली आहे. सध्या चांगल्या प्रतीच्या कांद्याला प्रति क्विंटल सुमारे २३०० ते २६०० रुपये दर मिळत आहे. या दरवाढीमुळे मागील तोट्यातून सावरत असलेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. परिणामी, यंदाच्या खरीप हंगामात कांदा लागवडीकडे त्यांचा कल वाढत असून, क्षेत्रवाढीची शक्यता आहे.

### लागवडीसाठी तयारी

यंदाच्या खरीप हंगामासाठी अनेक शेतकऱ्यांनी कांदा लागवडीची तयारी सुरू केली आहे. शेतीची मशागत पूर्ण करून जमीन तयार ठेवण्यात आली असून, काही ठिकाणी बियाणांची खरेदीही सुरू झाली आहे. येत्या काही दिवसांत पेरणीला वेग येण्याची शक्यता आहे. योग्य नियोजन, वेळेवर पेरणी आणि अनुकूल हवामान मिळाल्यास चांगले उत्पादन मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# आई-वडील वेगळे होऊ शकतात, पण जबाबदारी नाही!

## नागपूर खंडपीठाचा निकाल, कौटुंबिक वादातून झाले होते विभक्त

प्रतिनिधी १७ जुलै

**अकोला :** अपत्यांचे संगोपन करणे आणि त्यांच्या भविष्याला आकार देणे, ही केवळ कायद्याने लादलेली सक्ती नसून, ती आई-वडील दोघांचीही नैतिक व तात्त्विक जबाबदारीही आहे, असा मर्मभेदक संदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे न्यायमूर्ती महेंद्र नेरलीकर यांनी एका प्रकरणावरील निर्णयात दिला.



अकोला कुटुंब न्यायालयाने दोन अल्पवयीन मुलींच्या उदरनिर्वाहासाठी २० हजार रुपयांची पोटगी मंजूर केल्यामुळे वडिलाने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. उच्च न्यायालयाने ती याचिका फेटाळून लावत कुटुंब न्यायालयाचा निर्णय योग्य ठरवला आणि वडिलाला त्याच्या कर्तव्याची जाणीवही करून दिली. आई-वडील विभक्त होऊ शकतात; पण मुलांचे पालकत्व कधीही संपुष्टात येत नाही. पालकांच्या नातेसंबंधांमध्ये कटुता निर्माण होते, तेव्हा त्याचे सर्वाधिक चटके निरागस मुलांना सोसावे लागतात. अशा अवलंबित जिवांचे अस्तित्व आणि त्यांचा सन्मान टिकवून ठेवणे, हा पोटगीच्या कायद्याचा मूळ उद्देश आहे. त्यामुळे वडिलांनी आपल्या जबाबदारीतून पूर्णपणे हात झटकणे तात्त्विक आणि कायदेशीर दोन्ही निकषांवर चुकीचे आहे, असे न्यायालय म्हणाले. आजच्या महागाईच्या काळात मासिक २० हजार रुपये पोटगी अजिबात जास्त नाही, याकडेही न्यायालयाने लक्ष वेधले. या प्रकरणातील वडील बुलडाणा, तर आई अकोला येथील रहिवासी असून ते दोघेही पोलिस हेड कॉन्स्टेबल आहेत. त्यांना १५ व ५ वर्षे वयाच्या दोन मुली आहेत. हे दाम्पत्य कौटुंबिक वादामुळे विभक्त झाले आहे.

### आईचे समर्पण पैशांत मोजता येत नाही

आईदेखील कमावती असल्यामुळे मुलींच्या संगोपनाचा आर्थिक भार फक्त आपल्यावरच टाकला जाऊ शकत नाही, हा वडिलाचा दावाही न्यायालयाने निरर्थक ठरवला. लहानपणापासून मुलींची संपूर्ण जबाबदारी आई एकटीच सांभाळत आहे. ती मुलींच्या रोजच्या गरजा, शिक्षण आणि आरोग्य यासाठी सतत झटत आहे. तिचे अमूल्य श्रम आणि समर्पण केवळ पैशांच्या गणितात मोजले जाऊ शकत नाही, असे न्यायालयाने नमूद केले.

# अकोली जहागीर येथे गॅस सिलेंडरचा भडका; घराला भीषण आग

वि प्रतिनिधी १७ जुलै

**अकोट :** तालुक्यातील अकोली जहागीर येथे गॅस सिलेंडरचा भडका उडाल्याने एका घराला भीषण आग लागून घरातील मौल्यवान साहित्य जळून खाक झाल्याची घटना गुरुवारी घडली. या घटनेमुळे गावात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसल्याने नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला. मिळालेल्या माहितीनुसार, अकोली जहागीर येथील ज्ञानेश्वर म्हैसणे यांच्या घरात रात्री सुमारे पावणे आठ वाजण्याच्या सुमारास अचानक गॅस सिलेंडरचा भडका उडाला. काही क्षणांतच आगीने रौद्र रूप




धारण करत संपूर्ण घराला वेढा घातला. घरातून धुराचे लोट आणि आगीच्या ज्वाळा उसळताना पाहून परिसरातील नागरिक घटनास्थळी धावले. घटनेची माहिती मिळताच ग्रामपंचायत सदस्य अमोल बदरखे यांनी तत्काळ अकोट नगर परिषदेच्या अग्निशमन दलाला तसेच अकोट ग्रामीण पोलिसांना दूरध्वनीद्वारे कळविले. माहिती मिळताच अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळविले. त्यामुळे आग शेजारील घरांमध्ये पसरण्याचा धोका टळला. या आगीत घरातील फर्निचर, कपडे, घरगुती साहित्य तसेच इतर मौल्यवान वस्तू जळून खाक झाल्याची प्राथमिक माहिती आहे. आगीची तीव्रता मोठी असली तरी घरातील सर्व सदस्य सुरक्षित बाहेर पडल्याने जीवितहानी टळली. दरम्यान, घटनेची नोंद अकोट ग्रामीण पोलिसांनी घेतली असून आगीचे नेमके कारण आणि झालेल्या आर्थिक नुकसानाचा पंचनामा करण्याचे काम सुरू आहे.

# राष्ट्रीय महामार्गावरील अनेक पथदिवे बंद

प्रतिनिधी १७ जुलै

**अकोला :** शहरी भागातच पथदिवे बंद राहतात असे नाही तर राष्ट्रीय महामार्गावरील देखील दुर्दैवाने ही स्थिती दिसते. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 53 वर बरेच पथदिवे बंद आहेत. रात्रीच्या वेळी वाहन चालकांची खूप तारांबळ होते. पथदिवे व्यवस्थित सुरू राहावे याकडे महामार्ग यंत्रणेने गांभीर्याने लक्ष द्यावे अशी मागणी आहे.

चौपदरी रस्ते झाल्यामुळे वाहनांची गती वाढली आहे. सुसाट वेगाने वाहने धावतात. रात्रीच्या वेळी थोडा अंदाज चुकला तरी अपघात झाला म्हणून समजा. रात्री वाहतूक सुरळीत सुरू राहावी म्हणून पथदिवे



सुरू राहिले पाहिजे. या बाबतीत टाळाटाळ करणे धोकादायक आहे. काही वाहन चालकांनी या संदर्भात व्यथा बोलून दाखवली. त्यामुळे हा विषय गांभीर्याने घेणे आवश्यक आहे. कारण वान चालकांच्या जीविताशी हा विषय निगडीत आहे. याकडे दुर्लक्ष होणे अत्यंत धोक्याचे आहे.

# शहरातील बेघर निवारा आणि उड्डाणा पुलाखाली राहणाऱ्या लोकांच्या मताधिकाराचे काय ?

## अनेकांकडे नाही मूळ गावातील कोणतीही कागदपत्रे

प्रतिनिधी १७ जुलै

**अकोला:** मतदानाचा अधिकार हा प्रत्येक पात्र नागरिकाचा घटनात्मक अधिकार आहे मतदानापासून कोणीही वंचित राहू नये म्हणून शहरात सुरू असलेल्या मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षण प्रक्रिये दरम्यान शहरातील बेघर निवारा उड्डाणपूल तसेच स्टेशन परिसरात राहणाऱ्या बेघर नागरिक आणि त्यांच्या मुलांसमोर मतदार पडताळणी चे गंभीर आव्हान उभे राहिले आहे आवश्यक कागदपत्रांचा अभाव कौटुंबिक नोंदी उपलब्ध नसणे आणि स्थलांतरित पार्श्वभूमी यामुळे अनेक पात्र मतदारांची नावे मतदार यादीतून वगळली जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या भिक मागून उदरनिर्वाह करणाऱ्या तसेच बेघर असलेल्या या लोकांमध्ये अनेक बाहेर राज्यातील सुद्धा आहेत अनेकजण स्थलांतरित झाले आहेत त्यामुळे त्यांच्या मूळ गावातील किंवा पालकांची संबंधित कागदपत्रांचा अभाव आहे एस आय आर प्रक्रियेत अशा कागदपत्रांची पडताळणी होत असल्याने त्यांच्यासमोर मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार अर्जदार किंवा त्यांच्या पालकांची 2002 किंवा त्यापूर्वीच्या मतदार यादीत नाव असल्यास पडताळणी तुलनेत सोपी होऊ शकते मात्र अशी नोंद नसलेल्या नागरिकांची अधिक सखोल तपासणी होण्याची शक्यता आहे त्या बेघर लोकांनी कधी मतदान केलेले नसल्याने किंवा अनेकांची कौटुंबिक नोंद उपलब्ध नसल्याने त्यांना अडचणीचा सामना करावा लागू शकतो ही समस्या केवळ पहिल्या पिढीपूर्ती मर्यादित नसून दुसऱ्या आणि तिसऱ्या पिढीतील मुलांनाही भेडसावत आहे अकोल्यात जन्मलेल्या आणि वाढलेल्या अनेक मुलांकडे जैविक कुटुंबाशी संबंध दर्शविणारी पुरेशी कागदपत्रे नसल्याने मतदार पडताळणीची प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.



### आम्ही भारताचे नागरिक राहणार की नाही?- मैनाबाई

अनेक वर्षापासून अकोल्यात वास्तव्यास असूनही मूळ गावातील कोणतीही कागदपत्रे नसल्याने स्वतःचे आणि मुलाचे नाव मतदार यादीत राहील की नाही याची भीती वाटत आहे मदतीसाठी कुठे जावे कोणाकडे संपर्क साधावा याबाबतही संभ्रम असल्याचे तिने सांगितले. मतदानाचा अधिकार हा प्रत्येक नागरिकाचा घटनात्मक अधिकार आहे परंतु अशा लोकांकडे अस्तित्वात नसलेला कौटुंबिक इतिहास सादर करण्याची अपेक्षा ठेवणे योग्य नाही. त्यामुळे अशा लोकांच्या मतदानाच्या अधिकाराबाबत शासन काय निर्णय घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे

# शेतात हरणांच्या कळपाचा हैदोस!



प्रतिनिधी १७ जुलै

**अमरावती :** एकीकडे पावसाने दडी दिली आहे तर दुसरीकडे बोगस बियाण्यांमुळे काही ठिकाणी बियाणे उगवले नाही. असे असतानाही शेतात सोयाबीन व कपाशी चे जे काही पीक आले आहे. हे हरणांचे कळप खराब करत आहेत. दर्यापूर - अकोला मार्गावर गोडेगावच्या शेतशिरात वीस ते पंचवीस हरणांचा कळप पिकांचे नुकसान करीत आहे. नागरिकांना पाहताना जरी हारणाचे कळप सुंदर दिसत असले तरी शेतकऱ्यांसाठी मात्र नुकसानदायक आहे. मात्र याकडे वनविभागाची दुर्लक्ष असून हरणाचे कळप पकडून मेळघाट उद्या द्यावी अशी मागणी होत आहे.

# धरणगावच्या युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

## मलकापूर पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद

प्रतिनिधी १७ जुलै

**मलकापूर :** तालुक्यातील धरणगाव येथे २८ वर्षीय युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना बुधवारी सकाळी उघडकीस आली. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राम राजेंद्र नेरकर (२८, रा. धरणगाव) हा युवक मराठी शाळेजवळील सरकारी विहिरीच्या परिसरात गेला होता. तेथील लोखंडी रॉडला दोरी बांधून त्याने गळफास घेतल्याचे सकाळी ७:३० सुमारास नागरिकांच्या निदर्शनास आले. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. माहिती मिळताच घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला.


पोलिसांनी तातडीने त्यानंतर मृतदेह पुढील तपासासाठी रुग्णालयात पाठविण्यात आला. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, याप्रकरणी दीपक हिंमत घुगरे यांनी दिलेल्या माहितीवरून शहर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक शुभम बरदाडे करीत आहेत.

# राम नगरात सुरु होता देह व्यापार, चार पुरुषांसह दोन महिलांना अटक

प्रतिनिधी १७ जुलै

**अकोला :** सिव्हिल लाइन्स पोलीस ठाण्याच्या हद्दीतील राम नगरमध्ये पोलिसांनी देह व्यवसायाच्या अड्ड्याचा पर्दाफाश केला. पोलिसांनी घरात छापा टाकून दोन महिलांसह चार पुरुषांना अटक केली.

गेल्या काही दिवसांपासून शहराच्या प्रतिष्ठित राम नगर भागातील एका फ्लॅटमध्ये देह व्यवसाय होत असल्याची चर्चा सुरु होती. या धंद्यासाठी बाहेर गावच्या महिलांना आमिष दाखवून आणले जात होते. राम नगरमधील एका घरात काही काळापासून संशयास्पद हालचाली होत असल्याच्या तक्रारी पोलिसांना मिळत होत्या. या माहितीची पडताळणी



करण्यासाठी, पोलिसांच्या एका विशेष पथकाने प्रथम त्या घरात एक बनावट गिऱ्हाईक पाठवले. एकदा सौदा निश्चित झाल्यावर आणि वेश्याव्यवसाय होत असल्याची खात्री झाल्यावर, पोलिसांनी त्या जागेवर छापा टाकला. या कार्रवाईत आक्षेपार्ह साहित्यही जप्त करण्यात आले. प्राथमिक तपासात असे समोर आले आहे की, आरोपी बाहेर गावच्या महिलांना वेश्या व्यवसाय करण्यासाठी येथे आनत होते. पोलीस आता या संपूर्ण नेटवर्कचा तपास करत आहेत.

पोलीस आणि परिसरातील दक्ष नागरिकांच्या समन्वयामुळे हे प्रकरण उघडकीस आले. ही कारवाई पाहण्यासाठी अपार्टमेंटसमोर मोठी गर्दी जमली होती. पोलिसांनी सर्व आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

# निकृष्ट बियाण्यामुळे शेतकऱ्याचे मोठे नुकसान; पंचनामा करून भरपाईची मागणी

प्रतिनिधी १७ जुलै

**अकोला :** अकोला तालुक्यातील सांगळूद बु. येथील शेतकरी आकाश राजेंद्र शिरसाट यांनी महाबीज KDS-992 सोयाबीन बियाण्याची उगवण अत्यल्प झाल्याने मोठे आर्थिक नुकसान झाल्याची तक्रार कृषी विभागाकडे केली आहे. या संदर्भात त्यांनी जिल्हा बीज निरीक्षकांकडे लेखी अर्ज सादर करून पंचनामा करून नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे. शिरसाट यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांनी मोरेश्वर कृषी केंद्रातून महाबीज KDS-992 या जातीचे सोयाबीन बियाणे खरेदी करून ६ जुलै २०२६ रोजी शेतात पेरणी केली. मात्र पेरणीनंतर सुमारे आठ दिवस उलटूनही केवळ २० टक्केच उगवण झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे. यामुळे पुन्हा पेरणी करण्याची वेळ आल्याने बियाणे, मजुरी, मशागत व इतर शेती खर्चात मोठी वाढ झाली असून आर्थिक फटका बसल्याचे शेतकऱ्याने नमूद केले आहे.

वाढीव दराने बियाणे खरेदी करूनही अपेक्षित उगवण न झाल्याने संबंधित बियाणे कंपनीची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. याप्रकरणी कृषी अधिकारी, संबंधित बियाणे कंपनीचे प्रतिनिधी व विक्रेत्यांच्या उपस्थितीत तातडीने पंचनामा करून वस्तुस्थितीची पाहणी करण्यात यावी आणि झालेल्या नुकसानीची योग्य ती भरपाई मिळावी, अशी मागणी अर्जातून करण्यात आली आहे.

# अपघातात दोन बॉडीबिल्डर्सचा मृत्यू; एक जण गंभीर


प्रतिनिधी १७ जुलै

**पुसद :** पुसद येथील शरीरसौष्ठव क्षेत्रातील दोन होतकरू युवा खेळाडूंचा हिंगोली येथे झालेल्या भीषण रस्ते अपघातात मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना गुरुवारी रात्री घडली. या अपघातात आणखी एक तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे पुसद शहरासह क्रीडा क्षेत्रात शोककळा पसरली आहे.

मृतांमध्ये परिमल राठोड (वय २२, रा. ग्रीन पार्क, श्रीरामपूर, पुसद) आणि उदय गजरे (वय १९, रा. सप्तगिरी नगर, पुसद) यांचा समावेश आहे. दोघेही शरीरसौष्ठव स्पर्धांमध्ये सक्रिय सहभाग घेत होते. अल्पवयातच विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करून त्यांनी पुसदचे नाव राज्यस्तरावर पोहोचविले होते.

प्राथमिक माहितीनुसार, काही कामानिमित्त हे तरुण एमएच ४३ एएल ३२५३ क्रमांकाच्या चारचाकी वाहनाने हिंगोलीला गेले होते. परतीच्या





प्रवासादरम्यान रात्री सुमारे १० ते १०.३० वाजण्याच्या सुमारास वाहनचालकाचा ताबा सुटल्याने वाहन रस्त्यावरील दुभाजकावर आदळले. अपघाताची तीव्रता इतकी होती की, वाहनाचे मोठे नुकसान झाले आणि परिमल राठोड व उदय गजरे यांचा जागीच मृत्यू झाला. अन्य एक तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. दरम्यान, वाहनात नेमके किती जण प्रवास करत होते, अपघाताचे नेमके कारण काय होते, याबाबत अद्याप अधिकृत माहिती उपलब्ध झालेली नाही. हिंगोली पोलिसांनी अपघाताची नोंद करून तपास सुरू केला असून सर्व बाबींची पडताळणी केली जात आहे. परिमल राठोड आणि उदय गजरे यांनी नियमित सराव, शिस्तबद्ध जीवनशैली आणि स्पर्धांमधील सातत्यपूर्ण कामगिरीमुळे युवा बॉडीबिल्डर्स म्हणून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली होती.




त्यांच्या अकाली निधनाने मित्रपरिवार, क्रीडाप्रेमी आणि नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त होत असून दोन्ही कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# बाळापूरला तीन अपत्य प्रकरणी नगरसेवक अपात्र

प्रतिनिधी १७ जुलै

**बाळापूर :** बाळापूर नगरपरिषदेच्या प्रभाग क्र. २ (ब) मधील नगरसेवक मुहम्मद अकरम यांना तीन अपत्य नियमाच्या प्रकरणात अपात्र ठरविण्यात आल्याचा आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, अकोला यांनी दिल्याची माहिती समोर आली आहे. या निर्णयामुळे बाळापूरच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून नगरपरिषदेत विविध चर्चांना उधाण आले आहे.

**जिल्हाधिकाऱ्यांचा महत्त्वपूर्ण निर्णय**

प्राप्त माहितीनुसार, दाखल करण्यात आलेल्या निवडणूक याचिको वर सुनावणी पूर्ण झाल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित कागदपत्रे व पुरावे विचारात घेऊन हा निर्णय दिला. आदेशानुसार संबंधित नगरसेवकाची सदस्यता तत्काळ प्रभावाने रद्द करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. संबंधित प्रकरण न्यायालयीन अथवा पुढील अपील प्रक्रियेत असल्यास अंतिम निकालानुसार परिस्थितीत बदल होऊ शकतो असे स्पष्ट केले आहे.

# अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजनेसाठी 24 जुलैपर्यंत मुदत

प्रतिनिधी १७ जुलै

**अकोला :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या वतीने मातंग समाज व तत्सम 12 पोटजातीतील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजना राबवण्यात येत आहे. पात्र विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेण्यासाठी 24 जुलैपर्यंत अर्ज सादर करावे लागणार आहेत. या योजनेत 2025 या शैक्षणिक वर्षात दहावी, बारावी, पदवी, पदव्युत्तर, वैद्यकीय, अभियांत्रिकी तसेच इतर अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेत असलेल्या मातंग समाज व तत्सम 12 पोटजातीतील विद्यार्थ्यांनी सरासरी 60 टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळवून उत्तीर्ण असावा.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135